१६५१७
म. ग्रं. सं. ठाणे
विषय भा. व्या
सं. क्र. २११

REFBK-0014093
REFBK-0014093

১৪০৫৩

২৭৭

2991
3912
भा. १८/2
REFBK-0014093

# दामल्यांचें शास्त्रीय मराठी व्याकरण

## टीका

## सुबंत विचार

### टीकामुख

गोवें प्रांतांतील फोंडा येथें निघणाऱ्या प्राचीप्रभा नांवाच्या चिमकुल्या मासिक-पुस्तकांतून प्रस्तुत टीकेंतील तिङंतविचार प्रसिद्ध झाला आहे. तें मासिकपुस्तक अति लहान पडल्यामुळें, सुबंतविचार प्रसिद्ध करावयास त्याला दोन वर्षें हि पुरणार नाहींत. ग्रंथमाला व विश्ववृत्त बंद पडल्यापासून, देशांत नांव घेण्यासारखें मोठेंसें मासिकपुस्तक उरलें नाहीं. सबब दामल्यांच्या व्याकरणावरील टीकेचा हा उत्तरार्ध स्वतंत्र चोपड्याच्या रूपानें काढला आहे.

(१)

### च–सर्वनाम

मराठींत च म्हणून एक सर्वनाम आहे. त्याचा शोध तर सोडून च द्या, परंतु अस्तित्व हि पूर्ववैयाकरणांना माहीत नाहीं. संस्कृतांत त्यद् म्हणून एक सर्वनाम आहे. हें सर्वनाम ग्रांथिक संस्कृतांत फारसें किंवा बिलकुल आढळत नाहीं. परंतु संस्कृत भाषा बोलण्यांत जेव्हां हमेष येत होती तेव्हां लोकप्रचारांत हें अतिशय होतें असें दिसतें. वैदिक भाषेंत, मात्र, हें त्यद् सडकून योजिलेलें आढळतें. वैदिक भाषेंतून लौकिक व प्रांतिक भाषाद्वारा हें त्यद् मराठींत आलें आहे. ह्या त्यद् चीं दोन रूपें मराठींत आहेत. (१) त्यो, त्यी, त्यें; व (२) चा, ची, चें.

(त्यः) स्यः = त्यो

(त्या) स्या = त्यी

त्यद् = त्यें
तसेंच
( त्यः ) स्यः = च्या = चा
( त्या ) स्या = च्या = ची
त्यद् = च्यँ = चें

त्यो–त्यी–त्यें हीं रूपें सध्यां अशिष्ट लोक मराठींत योजतात व जुन्या मराठी पोथ्यांत सांपडतात.

चा–ची–चें हीं रूपें, मात्र, शिष्ट मराठींत हमेष योजतात. तो प्रकार असा.

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| घर | चें | घर | = गृहं | त्यद् | गृहं | ( एकवचन ) |
| घरें | चीं | घरें | = गृहाणि | त्यानि | गृहाणि | (अनेकवचन) |
| स्त्री | चीं | स्त्री | = स्त्री | स्या | स्त्री | ( एकवचन ) |
| स्त्रिया | च्या | स्त्रिया | = स्त्रियः | त्याः | स्त्रियः | (अनेकवचन) |
| पुरुष | चा | पुरुष | = पुरुषः | स्यः | पुरुषः | ( एकवचन ) |
| पुरुष | चे | पुरुष | = पुरुषाः | त्ये | पुरुषाः | (अनेकवचन) |
| गांव | चा | गांव | = ग्रामः | स्यः | ग्रामः | |
| शहरें | चीं | शहरें | = नगराणि | त्यानि | नगराणि | |
| बाग | चे | बाग | = आक्रीडाः | त्ये | आक्रीडाः | |
| थवे | चे | थवे | = स्तबकाः | त्ये | स्तबकाः | |
| गाडी | ची | गाडी | = गंत्रिः | स्या | गंत्रिः | |
| जो | चा | जो | = यः | स्यः | यः | |
| तो | चा | तो | = सः | स्यः | सः | |
| ती | ची | ती | = सा | स्या | सा | |
| जशी | ची | तशी | = यादृशी | स्या | तादृशी | |

असे प्रयोग ह्या ( चा, ची, चें ) च सर्वनामाचे होतात. ह्या सर्वनामाच्या विभक्तींचे प्रयोग एणेंप्रमाणें:—

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| सोमवार | चा | सोमवार | = सोमवारः | स्यः | सोमवारः | ( प्रथमा ) |
| सोमवारीं | च्यां | सोमवारीं | = सोमवारे | त्यस्मिन् | सोमवारे | ( सप्तमी ) |
| सोमवारा | च्यां | सोमवारास | = सोमवाराय | त्यस्मै | सोमवाराय | ( चतुर्थी ) |
| सोमवारा | च्या | सोमवारा | = सोमवारस्य | त्यस्य | सोमवारस्य | ( षष्ठी ) |
| सोमवारें | चेन, चें | सोमवारें | = सोमवारेण | त्येन | सोमवारेण | ( तृतीया ) |
| घरीं | च्यां | घरीं | = गृहे | त्यस्मिन् | गृहे | ( सप्तमी ) |
| बायकां | च्यां | बायकांनीं | = स्त्रीभिः | त्याभिः | स्त्रीभिः | ( तृतीया ) |

पुरुषां   च्या (चे) पुरुषांस = पुरुषेभ्यः   त्येभ्यः पुरुषेभ्यः   ( चतुर्थी )
महिन्या   च्या   महिन्यास = मासाय   त्यस्मै मासाय   ( चतुर्थी )

त्यो, त्यी, त्यें, हीं सर्वनामरूपें स्वतंत्र योजिलीं जातात; तो, ती, तें, यांच्या-प्रमाणें. परंतु, चा, ची, चें, हीं रूपें स्वतंत्र योजिलीं जात नाहींत. नामांच्या किंवा इतर सर्वनामांच्या किंवा शब्दांच्या पुढें तीं येतात.

जसें चें तसें

जस्या, जशा, च्या तशास

माझा मी, तुमचे तुम्ही, ज्याचा तो, कोणचें कोण, हीं उदाहरणें ह्या त्यद् ऊर्फ च सर्वनामाचीं नव्हत. दामल्यांनीं तीं आपल्या व्याकरणांत ( पृष्ठ ६७८ टीप २ ) चुकीनें तेथें नमूद केलीं आहेत. माझ, तुमच, ज्याच, कोणाच हीं चान्त विशेषणें व नामें आहेत. त्यांचीं प्रथमेचीं रूपें तुझा, तुमचा; माझा, ज्याचा, कोणाचें, हीं आहेत. ही हि बाब वैयाकरणांना माहीत नाहीं.

घर चें घर, ह्याचा अपभ्रंश घर च्या घर. घर च्या घर हा अशुद्ध प्रयोग आहे. तो वेडाच्या वेडा आहे ( दामले व्याकरण, पृष्ठ ६७९ ) हा प्रयोग अशुद्ध आहे. शुद्ध प्रयोग असाः— तो वेडा चा वेडा आहे.

( अशुद्ध ) जशाच्या तसा = ( शुद्ध ) जसा चा तसा
( अशुद्ध ) कोराच्या कोरा = ( शुद्ध ) कोरा चा कोरा
( अशुद्ध ) ढच्या ढ = ( शुद्ध ) ढ चा ढ

हें च-सर्वनाम मागील शब्दाला जोडून काढूं नये, स्वतंत्र लिहावें. षष्ठी विभक्तीचे अर्थ सांगतांना, ह्या च-सर्वनामाला षष्ठीचा प्रत्यय समजून दामल्यांनीं ( ६७९ ) ह्याचे साकल्यादि अर्थ दिले आहेत !

---

# ( २ )

## च-अव्यय

त्यद् हा शब्द वेदभाषेंत अव्यय हि आहे. ह्या त्यद् पासून मराठींत च हें अव्यय आलें आहे.

त्यद् = चिअ = चि = च

त्वं ह त्यद् इन्द्र कुत्सं आवः = तूं च इंद्रा कुत्साला राखिलेंस.

हा च अवधृतेचीार्थक आहे. वेदांत त्यद् हि अवधारणार्थक च आहे. ज्ञानेश्वरींत चि हें रूप येतें

तूं च, रामा च, मी च, ह्या स्थलीं अवधारणा आहे. महाराष्ट्री–व्याकरणकार समुच्चयार्थक च्चिअ एव या संस्कृत अव्ययाबद्दल येतो असें सांगतात. म्हणजे एव स्थलीं च्चिअ आदेश होतो, एवढें च सांगतात. च्चिअ ची व्युत्पत्ति सांगत नाहींत. महाराष्ट्री च्चिअ चा उगम पिशेललां दाखवितां आला नाहीं.

च हें सर्वनाम व च हें अव्यय स्वतंत्रपणें वेदभार्षेतून महाराष्ट्री, शौरसेनी, वगैरे प्राकृतांहून निराळ्या अशा प्रांतिक भाषेच्या द्वारा मराठींत आलें आहे. सध्यां जी महाराष्ट्री भाषा आपणाला उपलब्ध आहे ती संपूर्णपणें आपल्यापर्यंत येऊन पोहोंचली नाहीं असा तरी एक पक्ष काढावा लागतो; किंवा मराठीची जननी किंवा मातामही, सध्या जी आपल्याला उपलब्ध महाराष्ट्री आहे तिच्याहून किंचित् भिन्न असावी म्हणजे जींत त्यदुत्पन्न च हें सर्वनाम व अव्यय होतें ती असावी, असा तरी दुसरा पक्ष काढावा लागतो.

---

## ( ३ )

### समुच्चयार्थक च ( अव्यय )

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| गृहं | च | गृहं | = घर | च | घर |
| गृहाणि | च | गृहाणि | = घरें | च | घरें |
| पाणी | च | पाणी | = पानीयं | च | पानीयं |

संस्कृतांत च समुच्चयार्थक असतो तो च च येथें मराठींत समुच्चयार्थक आहे. हा च महाराष्ट्रीद्वारा आलेला नाहीं; मूळ संस्कृतांतून च मराठीनें घेतला आहे. घरें च घरें म्हणजे घरें आणि घरें म्हणजे पुष्कळ घरें. घर च घर म्हणजे विस्तीर्ण घर. तात्पर्य या च चा अर्थ समुच्चय, विस्तार, असा आहे.

---

## ( ४ )

### तत्संबंधक ईच

संस्कृत ईय ( छ, छण् ) प्रत्ययापासून हा तत्संबंधक ईच निघाला आहे.

ईय = इज्ज = ईच = च

| | | |
|---|---|---|
| शालीय | = शाळेच | ( चा – ची – |
| मालीय | = माळेच | ( चा – ची |
| पाणिनीय | = पाणिनीच | ( चा – ची |
| रामीय | = रामाच | ( चा – |

हरीय = हरीच ( चा – ची – चें )

गृहीय = घरीच ( चा – ची – चें )

हीं ईच प्रत्ययान्त तद्धितें नामें किंवा विशेषणें असतात.

गाढवीचा कोठें गेला ( नाम )

घरीच्यांस दूर करी ( नाम )

माळेचे मणी ( विशेषण )

संस्कृत गृहीय, मालीय, गर्दभीय, हे जसे षष्ठ्यन्त शब्द नाहींत, किंवा करण्याचें, मारण्याचें, पिणेचें, हे जसे षष्ठ्यन्त शब्द नाहींत, त्याप्रमाणें च घरीच, दारीच, वनीच, हे हि षष्ठ्यन्त शब्द नाहींत. अज्ञानानें वैयाकरणपाश त्याला षष्ठी म्हणोत. परंतु ती वस्तुत षष्ठी नाहीं.

तदीय = त्याच ( चा – ची – चें )

अस्मदीय = आमचे ( चा – ची – चें )

त्वदीय = तुझ ( चा, ची, चें )

ह्या हि षष्ठ्या नाहींत; नामें किंवा विशेषणें आहेत.

त्याचें लिहून होईल = तदीयं लेखनं भविष्यति

जसें तदीय हें लेखन याचें विशेषण, तसें च त्याचें हें लिहून या नामाचें विशेषण आहे. लिहून हें नाम आहे, हें मागें सांगितलें च आहे. त्याचें ही षष्ठी धरून व लिहून हें ऊनधातुसाधित धरून, झालें याला षष्ठ्यन्त त्याचें हा कर्ता करणें हा केवळ पंचद्राविडीप्राणायाम आहे. नुसतें, लिहून होईल, असें हि संपूर्ण वाक्य होतें. या वाक्यांत लिहून हें नाम धातुरूपेश आहे. तस्य ही खरोखरीची षष्ठी आहे. तदीय – त्याच हें विशेषण आहे.

---

## ( ५ )

## त्यक् = च

म्याक्स मूलर म्हणतो कीं संस्कृत षष्ठीच्या स्य पासून त्य प्रत्यय निघाला. त्याचा च अनुवाद डॉक्टर सर रामकृष्ण भांडारकर करतात. पण वस्तुस्थिति ह्याहून निराळी असलेली दिसते. त्य ( त्यक् ) प्रत्यय त्यद् या सर्वनामापासून निघालेला आहे. षष्ठीच्या स्य पासून तो निघता, तर त्याला तिन्हीं लिंगीं व दोन्हीं वचनीं विकरण झालें नसतें. कारण, जनक शब्दाचे गुणधर्म जन्य शब्द प्रायः एकाएकीं सोडीत नाहींत. आतां, त्य या प्रत्ययाची उत्पत्ति त्यद् या सर्वनामापासून धरिली म्हणजे ही विकरणशीलतेची अडचण राहत नाहीं, सबब ही च व्युत्पत्ति खरी, असें मला दिसतें.

अत्र + त्यद् = अत्रत्य ( एथच )
कुत्र + त्यद् = कुत्रत्य ( कुठच )
दक्षिणा + त्यद् = दाक्षिणात्य ( दक्षिणच, खालच )
ततस् + त्यद् = ततस्त्य ( तेथच )

अव्ययांना व तसन्त नामरूपांना हा त्यक् संस्कृतांत लागतो. तसाच तो मराठींत हि लागतो.

---

## ( ५½ )

## षष्ठी + सर्वनाम च

मराठींत जी खरी षष्ठी आहे तिच्या पुढें त्यत् पासून निघालेलें च सर्वनाम हमेश येतें.

रामस्य त्यद् गृहं = रामा चें घर
रामा ही षष्ठी. चें म्हणजे तें
रामाचें घर = That house of राम
रामा घरीं = At the house of राम
रामा च्या घरीं = At that house of राम

हें त्यद् पासून निघालेलें च सर्वनाम सहज च तिन्हीं लिंगीं व दोन्हीं वचनीं चालतें.

हाता बोटें पांच आहेत = There are five fingers of the hand
हाता चीं बोटें पांच आहेत = Those fingers of the hand are five

चीं हें सर्वनाम दर्शक बोटें या नामाशीं समानाधिकृत.

घरा चीं दारें = घरा तीं दारें = Those doors of the house
डोक्या चे केस = डोक्या ते केस = Those hairs of the head
नदी चें पाणी = नदी तें पाणी = That water of the river

सारांश, खरी ज्ञानेश्वरी षष्ठी मराठींत सर्वत्र आहे. ती माहीत नसल्यामुळें, घराच, डोक्याच, नदीच, ह्या दोन निरनिराळ्या शब्दांना एकत्र लिहून आमचे मराठी वैयाकरण त्यांना षष्ठी म्हणतात. सुतार व लोहार पाणिनीचें काम करूं लागल्यावर ह्याहून आणखी कोणता चुथडा व्हावा?

१ देवघरीं ( समास )
२ देवा घरीं ( षष्ठी नुसती )
३ देवा च्या घरीं ( च सर्वनामाची सप्तमी + षष्ठी )

---

## ( ६ )

### ( एय – ढक् प्रत्ययोत्पन्न ) ईंच

भागिनेय = बाहिणेच ( चा – ची – चें )
हात् तिच्या बाहिणेचा मी = हंत तदीयस्य भागिनेय अहं
वाराणसेय = बनारसेच ( चा–ची–चें )

---

### ( स्थ पासून निघालेला ) च

गृहस्थ = घरत्थ = घरच्च = घरच ( चा – ची – चें )
तलस्थ = तलत्थ = तलच्च = तळच ( चा – ची – चें )
ग्रामस्थ = गावंत्थ = गांवच्च = गांवच
हस्तस्थ = हत्तत्थ = हातच्च = हातच

हीं चान्त विशेषणें स्थ पासून निघालेला च प्रत्यय लागून होतात. हे समास असल्यामुळें प्रथमशब्दावर आघात पडतो आणि त्यामुळें च्च च्या मागील अ चा आ होत नाहीं.

नीतीचा माणूस = नीतिस्थः मनुष्यः
बुद्धीचा माणूस = बुद्धिस्थः मनुष्यः

---

## ( ७ )

### ( पंचमीचा ) हूनच ( चा – ची – चें )

पंचमीचा किंवा सप्तमीचा जो तस् प्रत्यय त्याला त्य प्रत्यय संस्कृतांत लागतो. ततस् + त्य = ततस्त्य, अतस्+त्य = अतस्त्य. त्याप्रमाणें,

गृहतस् + त्य = गृहतस्त्य
( महाराष्ट्री ) गृहतः = घरत्तो
घरत्तो = घरातून
गृहतस्त्य = घरत्तो + च = घरातूनच ( चा – ची – चें )

---

## (८)

### ( अर्थ-शब्दोत्पन्न ) चं

अर्थ = अत्थ = अच्च = आच

| | |
|---|---|
| लग्नाची मुलगी | = लग्नार्था बालिका |
| मुंजीचा मुलगा | = मौंज्यर्थः बालकः |
| स्नानाची शिळा | = स्नानार्था शिला |
| संध्येची पळी | = संध्यार्था दर्वी |
| पाण्याचा बैल | = पानीयार्थः बलीवर्दः |
| पाण्याची विहीर | = पानीयार्था वापिका |
| गव्हांचें पेंव | = गोधूमार्थं विवरं |
| आगबोटीचे उतारू | = अग्निपोतार्थाः प्रवासिनः |
| स्लेटीचा दगड | = पाट्यर्था दृशद् |
| विद्येचें तप | = विद्यार्थं तपः |
| शाळेचीं मुलें | = शालार्थाः बटवः |
| वाहनाचा घोडा | = वाहनार्थः घोटकः |
| तुपाचा रुपया | = घृतार्थः रूप्यकः |
| घराचा सुतार | = गृहार्थः सूत्रहारः |

---

## (९)

### ( य प्रत्ययोत्पन्न ) च

| | |
|---|---|
| जात्यः क्षत्रियः | = जातीचा क्षत्रिय |
| गृह्यः संस्कारः | = घरचा संस्कार |
| गृह्या धेनुः | = घरची गाय |

शिवाय यत्, क्यप्, अनीयर्, वगैरे कृत् प्रत्ययांपासून निघालेला च निराळा च. त्याचें विवरण मागें झालें च आहे.

---

येणेप्रमाणें ( १ ) घरच, ( २ ) घरच, ( ३ ) घरीच, ( ४ ) घराच, ( ५ ) घराच, ( ६ ) घराहूनच, घरातूनच, घरूनच, हीं रूपें ( १ ) स्थ, ( २ ) य, ( ३ ) ईय, ( ४ ) त्यद्, ( ५ ) अर्थ, ( ६ ) तस्त्य, इत्यादि निरनिराळ्या प्रत्ययांपासून निघालेलीं आहेत व हीं सर्वनामें, विशेषणें किंवा नामें आहेत.

आजपर्यंत ह्या च च्या उगमासंबंधानें फार घोटाळा माजला होता. कोणी एकस्या इय प्रत्ययापासून तो निघाला असें भीतभीत सुचवीत ( कृष्णशास्त्री चिपळूणकर ). . कोणी स्य पासून त्य निघाला व त्या त्य पासून च निघाला, अशी तिरपगडी प्रतिपादना करीत ( भांडारकर ). कोणी साक्षात् षष्ठीच्या स्य पासून च निघाला, असा एकेरी हट्ट घेऊन बसत. तात्पर्य एका कोणत्या तरी उगमापासून सर्व प्रकारचे च निघाले असावे, असा आजपर्यंतचा सर्वांचा ग्रह होता. तो अर्थात् खोटा होता. हें चान्त विशेषण व नाम सात आठ तऱ्हेनें सात आठ प्रत्ययांपासून मराठींत साधिलेलें आहे. आणि त्या प्रत्ययांपैकीं एकाचा हि संस्कृत स्य ह्या षष्ठीच्या प्रत्ययाशीं दूरचा हि संबंध व संपर्क नाहीं.

हीं चान्त सर्वनामें, विशेषणें व नामें षष्ठीचीं रूपें आहेत, असें कल्पून, दामले आपल्या व्याकरणांत ( पृष्ठ ६७६।६७७ ) षष्ठीच्या कारकार्थाचें गणन करीत आहेत. तें अर्थात् अप्रयुक्त होय. ह्या अनेकप्रत्ययोत्पन्न च ला षष्ठी म्हणण्याचें सोडून द्यावें, हा शास्त्रशुद्ध मार्ग होय.

अत्र ( सप्तमी ) त्य = अत्रत्य

तसें दिवसाँ ( सप्तमी ) च्च = दिवसाँच ( चा-ची-चें )

तो दिवसांचा निजतो, येथें दिवसांचा हें विशेषण तो चें.

रात्रौ ( सप्तमी ) त्य = रात्रीं ( सप्तमी ) च्च = रात्रींच ( चा-चीं-चें )

ती रात्रींची जागते, येथें रात्रींची हें विशेषण ती चें

ऊष्णकाले ( सप्तमी ) त्य = उन्हाळ्यां ( सप्तमी ) च्च = उन्हाळ्यांच ( चा-ची-चें )

तें उन्हाळ्याचें महाबळेश्वरास जातें, येथें उन्हाळ्याचें हें विशेषण तें चें.

ह्या च चे खेळ हे असे नानाविध आहेत.

---

## ( १० )

मराठींत खरी षष्ठी एक च आहे. तिचीं उदाहरणें,

१ भीष्मा तळीं
२ घरा बाहेर
३ लोकां देखत
४ अंगा सारखें
५ सीता मुखें
६ भिंती जवळीं

२

हें षष्ठीचें रूप शेंकडों स्थळीं व हजारों वेळां मराठींत योजिलें जातें. दादोबानें यान्त रूपांना षष्ठीचीं रूपें म्हणून एकदा जें म्हटलें तें चेडयाप्रमाणें वैयाकरणांच्या पाठीस लागलें व त्याच्यापासून त्यांची सुटका व्हावयाला हा वेळ पातला.

---

## ( ११ )

### तें

( १ ) गमनं प्रति उत्सुकः = गमनातें उत्सुक
रामं प्रति ब्रूते = रामातें बोलतो
प्रतकि ( अकच्क ) = अतइ = अते = ते
ही कर्मप्रवचनीय द्वितीया आहे

( २ ) फलार्थं गच्छति= फलातें जातो
धनार्थं यतते = धनातें जततो

अर्थं = अत्थं = आतं = आतें

( ३ ) ग्रामस्य अंतिकं= गावा आंतिअ = गावा आंते = गावातें
( ४ ) ग्रामाय तस्मै = गावा तेया = गावाते

येणेंप्रमाणें तें– ते हा प्रत्यय मराठींत च्यार तऱ्हानीं येतो.

---

## ( १२ )

### स

( १ ) तो त्यास म्हणतो = स तस्मै भणति
तो तीस म्हणतो = स तस्यै भणति
स्मै = सइ = सि = स
ज्ञानेश्वरीभाषेंत तेयासि. नंतर त्यासि. सध्या त्यास
स्यै = सइ = सि = स

हा चतुर्थीचा सि– स प्रत्यय सर्वनामांच्या स्मै– स्यै प्रत्ययापासून मराठींत आला आहे. यद्यपि महाराष्ट्र्यादि प्राकृतांत तस्मै, तस्यै ह्यांचे अपभ्रंश सांपडत नाहींत, तत्रापि, मराठी ज्या महाराष्ट्रीसम प्रांतिक प्राकृतापासून उत्पन्न झाली, तींत ह्या

५ ३९१ ज्ञा.१९ २

रूपांचे अपभ्रंश होते, असें म्हणावें लागतें. त्याला उत्तम प्रमाण म्हटसें म्हणजे वर्तमान मराठींतील त्यासि- त्यास, सि- स, हे चतुर्थीचे प्रत्यय. अनेकवचनीं आनि-आन् प्रत्ययोत्पन्न अनुनासिक येऊन अनेकवचन त्यांसि, त्यांस असें होतें. ज्ञानेश्वरी भाषेचें व्याकरण लिहितांना हा उगम माझ्या लक्ष्यांत आला नव्हता. तेव्हां प्रायः मी असा सिद्धांत गृहीत धरून चाललों होतों कीं महाराष्ट्री व अपभ्रंश हे च काय ते मराठीचे उगम. परंतु, विचारान्तरानें अलीकडे मला असें दिसून येऊं लागलें कीं अनेक स्थलीं महाराष्ट्री, अपभ्रंश, व शौरसेनी ह्यांच्या हि पलिकडे मराठीचे उगम आहेत.

( २ ) वाघ गाईस मारतो = व्याघ्रः गां सम् मारयति

येथें कर्मप्रवचनीय द्वितीया आहे.

( ३ ) घरास विहीर आहे = गृहस्य अभ्यासे वापिः अस्ति
नदीस शेतें आहेत = नद्याः ( अभि ) आशे क्षेत्राणि संति
त्या डोंगरास रान आहे = तस्य पर्वतस्य (अभि) आशे अरण्यं अस्ति

येथें आशे ह्या सप्तमीपासून आसि, सि, स हा प्रत्यय मराठींत आला आहे.

( ४ ) तो गावासनी जातो = सः ग्रामसंनिधं गच्छति
त्यासनी वस्त्र नाहीं = तत्संनिधौ वस्त्रं नास्ति
त्यासनी पुसा = तत्संनिधं पृष्टव्यं

येथें संनिध=संनिह=सानिअ = सनी अशा परंपरेनें सनी हा प्रत्यय आलेला आहे.

( ५ ) दर घरास एक दिवा = गृहशः दीपः
महिन्यास एक व्रत = मासशः व्रतं
पायलीस पसा = प्रस्थशः प्रसृतिः

येथें शस् पासून स प्रत्यय आला आहे.

( ६ ) घरास घर लागून आहे = गृहस्य सकाशे गृहं लग्नं अस्ति
पैशास पैसा मिळतो = द्रव्यस्य सकाशे द्रव्यं मिळति

ह्या साहा उगमांपासून मराठी सि - स प्रत्यय आला आहे.

---

## ( १३ )

## ला

( १ ) लागि, लग, ह्या शब्दांपासून ला हा प्रत्यय ज्ञानेश्वरानंतर मराठींत आला आहे. ज्ञानेश्वरकालीं लागि प्रत्यय लागत असे.

( २ ) ला हा प्रत्यय संस्कृत आरात्पासून हि निघाला आहे.

आरात् = आलाअ = आला = ला

तो डोंगराला जातो = स पर्वतस्य आरात् गच्छति

तो गावाला जातो = स ग्रामस्य आरात् गच्छाति

परंतु

तो भाजीला जातो म्हणजे भाजीलागि जातो

येथें लागि पासूनचा ला आहे.

( ३ ) ला हा प्रत्यय परा ह्या आभिमुख्यार्थी कर्मप्रवचनीयापासून हि निघाला आहे.

परा = अला = ला

हां ला द्वितीयेच्या रूपांना लागतो. महाराष्ट्रांत द्वितीयेचीं रूपें वाघां व वाघा अशीं होत. ह्या रूपांना आभिमुख्यार्थक, धर्षणार्थक किंवा हिंसार्थक परा ह्या कर्मप्रवचनीयापासून निघालेला ला प्रत्यय लागतो.

व्याघ्रः गां परा मारयति = वाघ गाईला मारतो

व्याघ्रः गां मारयति = वाघ गाय मारतो

गाईला ही कर्मप्रवचनीय द्वितीया

गाय ही साधी द्वितीया

वाघ गाईलागुनि अथवा गाईला मारतो, येथें गाईला ताडण करतो असा अर्थ आहे.

वाघ गाईला मारतो, या वाक्याचे दोन अर्थ आहेत, ( १ ) वाघ गाय ठार मारतो; व ( २ ) वाघ गाईस ताडण करतो. पहिल्या अर्थी हिंसार्थक परा ह्या कर्मप्रवचनीयापासून निघालेला ला प्रत्यय लागतो व दुसऱ्या अर्थी लागि पासून निघालेला ला स्पर्शार्थी लागतो.

( १ )

वाघ गाईस मारतो = व्याघ्रः गां सं मारयति ( कर्मप्रवचनीय द्वितीया )

वाघ गाईतें मारतो = व्याघ्रः गां प्रति मारयति ( कर्मप्रवचनीय द्वितीया )

वाघ गाईला मारतो = व्याघ्रः गां परा मारयति ( कर्मप्रवचनीय द्वितीया )

परंतु

( २ )

गाईस गवत = गवे गवत्तम् ( चतुर्थी )

गाईतें गवत = गवार्थे गवत्तम् ( चतुर्थी )

गाईला गवत = गाई लागि गवत ( चतुर्थी )

आणि

वाघ गाय मारतो = व्याघ्रः गां मारयति ( द्वितीया साधी, दामल्यांची प्रथमा )

हे तीन प्रकारचे प्रयोग आहेत. पहिल्या प्रयोगांत कर्मप्रवचनीय द्वितीया आहे. दुसऱ्या प्रयोगांत चतुर्थी आहे. तिसऱ्या प्रयोगांत संस्कृतभाषेच्या दृष्टीनें द्वितीया आहे, दामल्यांच्या दृष्टीनें प्रथमा आहे. आतां, एथें मराठी वैयाकरणांमध्यें असा विचित्र वाद लागला कीं गाईला गवत लागतें व वाघ गाईला मारतो, या वाक्यांत गाईला हें रूप कोणत्या विभक्तीचें आहे. कोणी म्हणत, दोन्हीं वाक्यांत गाईला हें रूप चतुर्थीचें आहे. कोणी म्हणत, पहिल्या वाक्यांत चतुर्थीचें रूप आहे व दुसऱ्या वाक्यांत द्वितीयेचें रूप आहे. दामले म्हणतात कीं, मराठींत बिलकुल द्वितीया च नाहीं तेव्हां दोन्ही वाक्यांत चतुर्थीचीं रूपें आहेत. पैकीं पहिल्या वाक्यांत चतुर्थीचें रूप आहे व दुसऱ्या वाक्यांत द्वितीयेचें रूप आहे, असें म्हणणारे जे वैयाकरण होते ते तसें त्या त्या रूपाच्या अर्थावरून म्हणत. ह्यावर दामल्यांनीं अशी शंका आणिली कीं, अर्थावरून विभक्ती ठरविणें शास्त्रपरिनालिकेच्या दृष्टीनें अशास्त्र आहे, प्रत्ययांवरून च विभक्ती ठरविल्या पाहिजेत. संस्कृतभाषेच्या शास्त्र-परिनालिकेच्या दृष्टीनें दामल्यांचें हें विधान अंशतः सशास्त्र आहे. प्रत्ययांवरून च प्रायः विभक्ती ठरल्या पाहिजेत. परंतु, तसें ठरविण्यापूर्वीं, एक मात्र बाब विसरतां कामा नये, ती बाब अशी कीं भिन्न उगमांपासून उत्पन्न झालेले भिन्न प्रत्यय एका च स्वरूपाचे दिसले तत्रापि ते संस्कृतांत किंवा मराठींत एक च समजतां कामा नये. गाईला गवत लागतें, या वाक्यांतील ला लागि पासून निघाला आहे; वाघ गाईला मारतो, ह्या वाक्यांतील ला परा ह्या कर्मप्रवचनीयापासून निघाला आहे; व शेत डोंगराला आहे, ह्या वाक्यांतील ला आरात् अव्ययापासून निघाला आहे. म्हणजे हे तीन ला प्रत्यय यद्यपि दिसण्याला एकसारखे दिसतात तत्रापि भिन्न आहेत. ह्या एकसारख्या दिसणाऱ्या भिन्न प्रत्ययांना एक समजून, आमचे विद्वान् वैयाकरण हमरीतुमरीवर आलेले आहेत. एक म्हणतो हा ला प्रत्यय द्वितीयेचा आहे, दुसरा म्हणतो चतुर्थीचा आहे, तिसरा म्हणतो दोन्हींचा आहे व चवथा म्हणतो केवळ चतुर्थीचा च असणें शक्य आहे, कारण मराठींत द्वितीया अजीबात नाहीं. सांगावयाला नको च कीं, प्रकृत स्थलीं चवघे हि चुकताहेत व चवघे हि थोड्याफार अंशानें बरोबर आहेत.

व्युत्पत्तितः पहातां दिसेल कीं, स, ला, तें, हे प्रत्यय मराठींत कर्मप्रवचनीयांपासून हि आले आहेत, अव्ययांपासून हि आले आहेत व संस्कृत विभक्तिप्रत्ययांपासून हि आले आहेत. कर्मप्रवचनीयांपासून जे स, ला, तें, हे प्रत्यय आले आहेत, त्यांना द्वितीयेचे प्रत्यय मराठींत गणणें युक्त आहे. अव्ययांपासून जे स, ला, तें आले आहेत त्यांना चतुर्थीचे प्रत्यय गणणें भाग आहे. आणि स्मै – स्यै ह्या सार्व-

नामिक प्रत्ययापासूनचा जो सि — स प्रत्यय तो जात्या च चतुर्थीचा आहे. तात्पर्य, मराठींत द्वितीयेचे हि प्रत्यय आहेत व चतुर्थीचे हि प्रत्यय आहेत. इतकेंच कीं दिसण्याला हे दोन्ही प्रकारचे प्रत्यय एकसारखे दिसतात. परंतु, ह्या गोष्टीला इलाज नाहीं. असे एकसारखे दिसणारे परंतु वस्तुतः व कार्यतः भिन्न प्रत्यय एका च भाषेंत असूं शकतात. उदाहरणार्थ, दामल्यांनीं ज्यांचा उद्धार केला आहे ते संस्कृतांतील तृतीयेच्या द्विवचनाचा, चतुर्थीच्या द्विवचनाचा व पंचमीच्या द्विवचनाचा भ्याम् प्रत्यय घ्या. येथें तर तीन विभक्तींचे प्रत्यय एकसारखे दिसतात. परंतु, ते वस्तुतः व कार्यतः भिन्न असल्याकारणानें, पाणिनीनें त्या त्या विभक्तींत त्या त्या भ्याम्‌ला घातलें आहे; संस्कृतांत द्विवचनीं चतुर्थी, किंवा पंचमी किंवा तृतीया नाहीं, असें म्हटलें नाहीं. असें जर तो म्हणता, तर त्याच्या पदरीं महदज्ञान आलें असतें. कारण, यद्यपि हे तीन विभक्तींचे भ्याम् एकसारखे दिसतात, तत्रापि संस्कृतपूर्व व वैदिकपूर्व भाषांत ह्या तिन्ही विभक्तींच्या द्विवचनाचे प्रत्यय निःसंशय भिन्न होते. जशी मराठी ही महाराष्ट्रीसदृश प्राकृत भाषेपासून व संस्कृतापासून निघाली आहे, तशीच संस्कृतभाषा व वेदभाषा तत्पूर्व मातृभाषा व मातामहीभाषा यांजपासून निघालेली आहे, ह्यांत संशय नाहीं. पाणिनि शकपूर्व ७०० पासून १५०० पर्यंतच्या काळांत केव्हां तरी झाला. त्याच्या अगोदर १००० वर्षे वेद-भाषेला दिलीं. तर तत्पूर्वी म्हणजे रामयुधिष्ठिर यांच्या कालीं जी भाषा आर्यांत प्रचलित होती, ती वेदभाषेची माता किंवा मातामही असावी. तिच्यातून अपभ्रंश होतहोत वैदिकभाषेंत व संस्कृत भाषेंत ह्या तिन्ही विभक्तींत सारखा दिसणारा भ्याम् प्रत्यय आला. त्याचे उगम कायकाय व कोणकोणते होते हें यद्यपि आपल्याला आतां कळण्याचा मार्ग उपलब्ध नाहीं, तत्रापि नाना उगम होते, ह्यांत संशय नाहीं. तोच प्रकार मराठींत झाला आहे. भिन्न अशा नाना उगमांपासून स, ला, तें, हे द्वितीयेचे व चतुर्थीचे एकसारखे दिसणारे प्रत्यय आले आहेत. परंतु, वस्तुतः व कार्यतः ते भिन्न आहेत. सबब त्यांची मिसळ त्या त्या विभक्तींत लावून देणें इतिहास दृष्टीनें, परंपरादृष्टीनें व शास्त्रदृष्टीनें सर्वथा अवश्य आहे.

आणि ह्या च न्याय साध्या द्वितीयेला हि लाविला पाहिजे. प्रथमेचीं व साध्या द्वितीयेचीं रूपें एकसारखीं दिसलीं म्हणून काय झालें! त्यांचे उगम भिन्न आहेत कार्यें हि भिन्न आहेत व एके स्थलीं रूपें हि भिन्न आहेत.

द्वितीया साधी

| | १ | २ |
|---|---|---|
| ( प्रथमा ) | राम | राम |
| ( द्वितीया ) | राम | राम |
| | रामा | रामां |

अशीं द्वितीयेचीं ( साध्या ) दोन रूपें मराठींत होतात व तीं महाराष्ट्री व अपभ्रंश त्यांच्या द्वारा येतात.

| | | |
|---|---|---|
| राम | रावणा | मारितो |
| आई | मुलां | म्हणते |

असे प्रयोग लौकिक बोलण्यांत हमेश ऐकूं येतात. ज्ञानेश्वरकालीं हे दोन्ही प्रयोग होते व सध्यां हि आहेत. एका प्रयोगांतील रूपें प्रथमेच्या रूपांसारखीं दिसतात, दुसऱ्या प्रयोगांतील भिन्न आहेत. तेव्हां, द्वितीया समूळ च काढून कसें भागेल ?

एवं च द्वितीयेचीं एकंदर तीन प्रकारचीं रूपें मराठींत होतातः—

| | | |
|---|---|---|
| १ | राम | राम. |
| २ | रामा | रामां |
| ३ | रामाते | रामांते |
| | रामाला | रामांना |
| | रामास | रामांस |

तिसरा प्रकार संस्कृतांतील कर्मप्रवचनीयांपासून निघाला आहे.

लागि पासून निघालेला ला प्रत्यय लागून तृतीया हि होते. मजला, रामाला, हीं त्याचीं उदाहरणें होत.

| | |
|---|---|
| मज, मजला | जाववतें |
| रामाला, विष्णूला | |

ह्या स्थलीं दामले कर्त्रर्थक चतुर्थी आहे, असें समजतात; परंतु, वस्तुतः एथें तृतीया आहे. ह्या तृतीयेच्या स–ला–तें प्रत्ययांचा उलगडा चौदाव्या अंकांत केला आहे.

( ४ ) फारशी रा चा हि ह्या द्वितीयेच्या व चतुर्थीच्या ला ला स्पर्श झालेला आहे.

( ५ ) षष्ठीच्या नां प्रत्ययापासून चतुर्थीचा ला निघाला, संस्कृत षष्ठीपासून मराठी चतुर्थी निघाली, वगैरे ( चिपळूणकर, दामले वगैरेंच्या ) कल्पना केवळ अज्ञानजन्य अतएव निराधार आहेत. ह्या असत्कल्पनांकडे यत्किंचित् हि लक्ष्य देण्याचें कारण नाहीं.

---

## ( १३½ )

## द्वितीया.

सम्, प्रति आणि परा हे निपात संस्कृतांत कर्मप्रवचनीय आहेत, उपसर्ग आहेत व गति हि आहेत. ते जेव्हां कर्मप्रवचनीय असतात तेव्हां त्यांच्यापासून मराठींत

द्वितीयेचे प्रत्यय उत्पन्न होतात. आतां, ते जेव्हां उपसर्ग किंवा गतिसंज्ञक असतात तेव्हां त्याच्या पासून मराठींत काय कार्य निष्पन्न होतें तें सांगतों.

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| रामः | रावणं | मारयति = | राम | रावण | किंवा | रावणा मारितो | |
| रामः | रावणं | घातयति = | राम | रावण | किंवा | रावणा घातितो | |
| रामेण | रावणः | घातितः = | रामानें | रावण | मारिला, घातिला | | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| कर्तरि | (प्रवचनीय) | रामः रावणं | प्रति | घातयति | = राम रावणातें | घातितो | (द्वितीया) |
| | (प्रवचनीय) | रामः रावणं | सम् | घातयति | = राम रावणास | घातितो | (द्वितीया) |
| | (प्रवचनीय) | रामः रावणं | परा | घातयति | = राम रावणाला | घातितो | (द्वितीया) |
| कर्मणि | (प्रवचनीय) | रामेण रावणं | प्रति | घात्यते | = रामानें रावणातें | घातिलें, मारिलें | (भावे |
| | (प्रवचनीय) | रामेण रावणं | सम् | घात्यते | = रामानें रावणास | मारिलें | ( भावे ) |
| | (प्रवचनीय) | रामेण रावणं | परा | मार्यते | = रामानें रावणाला | मारिलें | ( भावे ) |
| कर्तरि | ( गति ) | रामः पुत्रिकां | प्रतिमारयति | | = राम मुलगी | तेमारतो | (द्वितीया) |
| | ( गति ) | रामः पुत्रिकां | संमारयति | | = राम मुलगी | समारतो | (द्वितीया) |
| | ( गति ) | रामः पुत्रिकां | परामारयति | | = राम मुलगी | लामारतो | (द्वितीया) |
| कर्मणि | ( गति ) | रामेण पुत्रिका | प्रतिमारिता | | = रामानें मुलगी | तेमारिली | (प्रथमा) |
| | ( गति ) | रामेण पुत्रिका | संमारिता | | = रामानें मुलगी | समारिली | (प्रथमा) |
| | ( गति ) | रामेण पुत्रिका | परामारिता | | = रामानें मुलगी | लामारिली | (प्रथमा) |

सं, प्रति, परा, हे तीन निपात जेव्हां गतिसंज्ञक असतात, तेव्हां त्यांचीं कर्मणि प्रयोगांत तेमारिली, समारिली व लामारिली अशीं रूपें होतात. मुलगी हा शब्द कर्मणि प्रयोगांत प्रथमान्त होतो. ह्या गतियुक्त तेमारिली, समारिली व लामारिली रूपांतील ते, स व ला ह्या गती चुकीनें मराठी वैयाकरण प्रथमान्त मुलगी ह्या शब्दाला लावून, मग मुलगीते, मुलगीस, मुलगीला ह्या कोण विभक्ति आहेत ह्याचा निर्णय करूं पहातात. अर्थात् जो जो निर्णय म्हणून करावा तो तो असमाधानकारक होतो. असें असमाधान झालें म्हणजे मग हे वैयाकरण

त्यानें मुलगी लामारिली ( प्रथमा, धातुरूपेश )

हा प्रयोग

त्यानें मुलगीला मारिली

असा चुकीचा लिहून, अशास्त्र व अशुद्ध आहे म्हणून शेरा ठोकतात. वस्तुतः हा प्रयोग गतियुक्त क्रियापदाचा आहे, व त्या त्या गती त्या त्या क्रियापदाला जोडून लिहिल्या पाहिजेत. परंतु, दादोबादि वैयाकरणखसूचीनीं जो एकदा चुकीचा रस्ता आंखून दिला तो आंगवळणी पडल्यामुळें, त्यांतून निघून सरळ रस्त्याला लागणें कष्टावह झालें आहे. तात्पर्य,

त्यानें तीं लामारिली

हा प्रयोग सशास्त्र व शुद्ध आहे व तो वर लिहिल्याप्रमाणें लिहावयास हवा.

कर्तरि
- तो पुत्रा  मारतो  ( साधी द्वितीया )
- तो पुत्रास मारतो  ( कर्मप्रवचनीय द्वितीया )
- तो पुत्रा  समारतो ( गतियुक्त क्रियापद, साधी द्वितीया )
- तो पुत्र  मारतो  ( साधी द्वितीया )

असा प्रकार आहे. सारांश, मराठींत च्यार प्रकारची द्वितीया आहे. (१) पुत्र ( साधी ), ( २ ) पुत्रा ( साधी ), ( ३ ) पुत्रास ( कर्मप्रवचनीय ) व ( ४ ) पुत्रा ( गतियुक्त क्रियापदामुळें ).

ह्या चारींचीं कर्मणि व भावे रूपें येणेंप्रमाणें.

त्यानें पुत्रा  मारिलें ( साधी द्वितीया, भावे )
त्यानें पुत्रास मारिलें ( कर्मप्रवचनीय द्वितीया, भावे )
त्यानें पुत्रा  समारिलें ( गति, भावे )
त्यानें पुत्र मारिला ( प्रथमा कर्मणि भावे )

पैकीं दुसरा व तिसरा प्रयोग पूर्ववैयाकरण एकसारखा लिहितात.

गतियुक्त क्रियापदांचे कर्मणि प्रयोग होतांना, नामांना इदम् सर्वनामापासून निघालेलीं आ व ई हीं सर्वनामें लागून प्रयोग होतातः—

त्यानें पुत्र  आ समारिला = त्यानें पुत्रासमारिला ( संधि )
त्यानें मुलगी ई  समारिली = त्यानें मुलगीसमारिली ( संधि )
त्यानें चांगलें आ समारिलें = त्यानें चांगल्यासमारिलें ( संधि )
त्यानें पुत्र  आ लामारिला= त्यानें पुत्रालामारिला ( संधि )
येथें संधि झालेले आहेत. हीं वाक्यें अशीं हि लिहितां येतातः—

रामानें  रावण  या समारिला ( आ = या )
रावणानें सीता  ईसमारिली
त्यानें   चांगले यासमारिलें

म्हणजे पुत्रआ ( पुत्रा ), मुलगी ई ( मुलगी ), रावण आ ( रावणा ), ह्या प्रथमा आहेत. त्यानें तृतीयान्त कर्ता; पुत्रा, मुलगी, चांगलेया–चांगल्या प्रथमान्त धातुरूपेश; समारिला, समारिली, समारिलें, कर्मणि रूपें; कर्मणि प्रयोग.

मराठींत असे संधि होतात. करित + आहेत = करताहेत = करतेत. राम + अस्मै = राम + आसिँ = रामासि = रामास – इ. इ. इ.

दामले ज्या प्रयोगाला कर्मभावसंकर म्हणतात तो हा च. वस्तुतः कर्म व क्रियापद यांचा संधि झालेला आहे. उदाहरणाचें पृथक्करण दामले इतकें नामी करितात कीं, सत्याच्या जवळ जवळ येऊन ते सदा ठेपतात. ते जर व्युत्पत्तीची मदत घेते, तर साक्षात् सत्य च त्यांच्या हातून नमूद झालें असतें.

रामानें रावणासमारिला, हें वाक्य रामानें रावणास मारिला, असें लिहून त्याचें व्याकरण करण्यास वैयाकरण जातात व पराकाष्ठेच्या गोंधळांत पडतात. रावणास तर चतुर्थीचें रूप भासतें. मारिला तर निःसंशय कर्मणि रूप आहे. तेव्हां एक च तोड उरते, ती ही कीं प्रयोग अशुद्ध व अशिष्ट आहे, असें म्हणावें. परंतु शिष्ट लोक हा प्रयोग हरहमेष करतांना आढळतात. तेव्हां, येथें कर्मभावसंकरप्रयोग आहे, असें म्हणणें ओघास येतें. परंतु, येथें संकर नाहीं, संधि आहे, हें वर दाखविलेंच आहे.

---

## ( १४ )

## तृतीयेचा नें

( १ ) रामेण = रामें व रामैः = रामेहीं, रामीं, अशीं रूपें ज्ञानेश्वरकालीन होत. तेणें असें रूप तेण खेरीज ज्ञानेश्वरींत येतें. तेण याचें जसें तेणें होतें, तसेंच रामेण याचें रामेणें. रामेणें पासून रामानें. रामेहीं = रामेन्हीं = रामानीं. अशी ही तृतीयेची परंपरा आहे. इतर रूपें ( चतुर्थीचीं वगैरे ) आघटित असल्यामुळें रामेणें व रामेन्हीं या रूपांतील ए चा आ झालेला आहे.

प्राकृत भाषा व विशेषतः प्राचीन मराठी भाषा यांच्या अज्ञानास्तव, द्वितीया, तृतीया, चतुर्थी व षष्ठि या विभक्त्यांच्या व्युत्पत्तिसंबंधानें दामले यानीं जे निकाल दिले आहेत, ते सर्व कच्चे व हास्यास्पद आहेत.

( २ ) मजशीं, रामाशीं, वगैरे रूपें मया समं, रामेण समं यांचे अपभ्रंश आहेत. मजसीं, रामेसीं, अशीं ज्ञानेश्वरकालीं रूपें होतीं. ए चा आ होतो व झाला आहे. रामाशीं – रामासीं – रामास या परंपरेनें तृतीयेचें रामास हें रूप निघालें आहे.

( ३ ) मजलागि, रामेंलागि, ह्या रूपांवरून मजला, रामाला, हीं तृतीयेचीं रूपें झालेलीं आहेत.

रामाला काम करवतें
रामास काम करवतें

( ४ ) ग्रामेण + तेन = गांवें तेण = गावें तें = गावातें.

रामेण + तेन = रामें तेण = रामें तें = रामातें.

अनुकरणानें ए चा आ.
रामातें काम करवतें.

---

९११ २०६१
१५१८



## एक

१ दामले कोणी या शब्दाची गणना सर्वनामांत करितात. कारण, सध्यां, आपण सोडून देऊं. कोणी म्हणतात कीं, ह्या प्रयोगांत कोणी हा शब्द सर्वनाम आहे हें दामल्यांस मान्य आहे. हुबेहुब ह्या प्रयोगासारखा च, एक म्हणतात कीं, हा प्रयोग आहे. कोणी म्हणतात कीं तें मांजर आहे, कोणी म्हणतात कीं तें डुकर आहे. हीं जशीं वाक्यें भासतात, तशीं च, एक म्हणतात हें मांजर आहे, एक म्हणतात हें डुकर आहे, हीं हि वाक्यें भासतात. असें जर आहे, तर कोणी प्रमाणें च एक ह्याला सर्वनाम कां म्हणूं नये ? एक हें अनिश्चितार्थक ( दामले-व्याकरण–पृष्ठ १२५ ) आहे असें दामले म्हणतील–तर कोणी हें तरी काय कमी अनिश्चितार्थक आहे, असें त्यांना उलट विचारतां येईल. तेव्हां कोणी हें जितकें सर्वनाम या संज्ञेस पात्र आहे, तितकें च एक हि आहे. कोणी हें जसें वाटेल त्या नामाबद्दल येतें तसें च एक हि येतें. कोणी म्हणतो, ह्या एकवचनी प्रयोगासारखा च, एक म्हणतो हा प्रयोग आहे. तात्पर्य, अर्थदृष्ट्या, कोणी आणि एक हे दोन शब्द सर्वनामसंज्ञेस सारखे च पात्र आहेत. आतां विकरणदृष्टीनें ह्या दोन शब्दांची तुलना करूं. कोणी हा ईकारान्त शब्द तिन्ही लिंगीं एकरूपक आहे. पैकीं पुल्लिंगी कोणी शब्द घेऊं. व त्याची तुलना दामल्यांच्या तेली व हत्ती ( पृष्ट ३७३ ) या ईकारान्त पुल्लिंगी शब्दांशीं करूं. तेली व हत्ती या शब्दांची तृतीया तेल्यानें व हत्तीनें अशी होते. कोणी ह्या शब्दाची तृतीया कोणीं अशी होते. तेव्हां विकरण-प्रकरणीं तेली व हत्ती ह्या ईकारान्त पुल्लिंगी शब्दांहून कोणी हा ईकारान्त पुल्लिंगी शब्द भिन्न आहे. आतां एक हा अकारान्त पुल्लिंगी शब्द पाट ह्या अकारान्त पुल्लिंगी शब्दाशीं तोलून पहातां कांहीं एक भेद दिसत नाहीं. परंतु एक हा अकारान्त स्त्रीलिंगी शब्द भिंत किंवा तरवार या अकारान्त स्त्रीलिंगी शब्दांशीं तोलून पहातां भेद दिसतो. प्रथमेचें अनेकवचन एकी किंवा एका होत नाहीं, एक असें होतें. कोणी ह्या ईकारान्त स्त्रीलिंगी शब्दाचें प्रथमेचें अनेकवचन कोणी असें च रहातें व चतुर्थीचें एकवचन कोणीस असें एकीस प्रमाणें होतें. म्हणजे स्त्रीलिंगी कोणी आणि एक हे शब्द समान चालतात. फक्त तृतीयेंत हे शब्द भिन्न चालतात. कोणी–कोणीं; परंतु एक–एकीनें. तात्पर्य, कोणी व एक हे शब्द इतर समान्तक शब्दांहून विकारप्रकरणीं कोणत्या नाहीं कोणत्या तरी बाबींत भिन्न आहेत व परस्पर हि भिन्न आहेत. परंतु कोणी हा शब्द मी, तूं, तो, जो, या शब्दांहून हि विकरणप्रकरणीं भिन्न आहे. त्या च प्रमाणें एक हा हि शब्द मी, तूं, तो, जो, व कोण या शब्दांहून विकरणप्रकरणीं भिन्न आहे. आणि असें जर

आहे, तर व्याकरणविकरणदृष्ट्या कोणी हा शब्द मी, तो, तूं, जो, या सर्वनाम शब्दांच्या वर्गांत दामले कां घालतात व एक ह्या शब्दाला त्या वर्गांत जाण्याला कां हरकत घेतात, तें कळणें दुर्घट आहे. परंतु, व्याकरणदृष्ट्या म्हणजे विकरणदृष्ट्या दामल्यांनीं ह्या सर्वनामांचा विचार च केलेला नाहीं. अर्थदृष्ट्या कांहीं लंगडापांगळा ऊहापोह केल्यासारखें करून संख्यादृष्ट्या इतर वैयाकरणांशीं तंडत बसण्यांत त्यांनीं व्यर्थ वेळ दवडिला आहे. सबब, ह्या वर्गीकरणाच्या दृष्टीनें सर्वनामांचा ऊहापोह होणें अत्यन्त इष्ट असल्यामुळें, ह्या प्रश्नाच। आणखी खल करतों.

मी, तूं, आपण, स्वतः, तो, हा, जो, कोण, व काय ह्या नऊ शब्दांना दामल्यांनीं सर्वनामांत गणिलें आहे; म्हणजे ह्या नऊ शब्दांचा एक वर्ग ऊर्फ गण केला आहे. आतां हा वर्ग कोणता समानधर्म पाहून केलेला आहे? ह्या नऊ शब्दांत कांहीं विकरणात्मक साधर्म्य सांपडतें म्हणून हा वर्ग केला आहे, असें दिसत नाहीं. संस्कृतांत सर्वादिवर्गांतील सर्वनामशब्दांत प्रथमेच्या अनेकवचनीं जसः शी ( ७–१–१७ ) ई प्रत्यय, चतुर्थीच्या एकवचनीं स्मै ( सर्वनाम्नः स्मै ७–१–१४ ) वगैरे साधर्म्यें सांगितलीं आहेत व ह्या साधर्म्यांच्यामुळें च सर्वादि सर्वनामांचा एक निराळा वर्ग बनविला आहे. तशीं कोणतीं विकरणात्मक साधर्म्यें पाहून वरील नऊ मराठी शब्दांचा स्वतंत्र वर्ग दामल्यांनीं बनविला? ह्या नऊ शब्दांत विकरणात्मक साधर्म्य तर बिलकुल नाहीं. नवांपैकीं कोणता हि एक शब्द बाकींच्या साऱ्या शब्दांसारखा कोणत्या तरी एक किंवा अनेक बाबींत चालत असलेला दिसत नाहीं. तेव्हां, संस्कृतांतल्याप्रमाणें विकरणसाधर्म्यावरून हा नवांचा वर्ग दामल्यांनीं बनविलेला नाहीं, हें उघड आहे. मग कोणत्या साधर्म्यावरून दामल्यांनीं हा वर्ग बनविला असावा? तर, तो उपयोगसाधर्म्यावरून दामल्यांनीं बनविला आहे. विशिष्टार्थद्योतक नसून जो विकारी शब्द पूर्वापरसंबंधानें वाटेल त्या नामाबद्दल उपयोगांत येतो, तो सर्वनामशब्द होय. (व्याकरण–पृष्ठ ९७) ह्या व्याख्येंत व्याकरणदृष्टीचें प्राधान्य नाहीं, उपयोगदृष्टीचें प्राधान्य आहे. सर्वनामांचे पोटभेद हि उपयोगदृष्टीनें च दामल्यांनीं बनविलेले आहेत. मग ही च उपयोगदृष्टि एक, अमुक, फलाणा, वगैरेंच्या वांट्यास कां बरें आली नाहीं? ज्या उपयोगास्तव कोणी हें सर्वनामवर्गांत गणावयाचें त्या च उपयोगदृष्टीस्तव एक, अमुक, फलाणा, हे हि शब्द सर्वनामवर्गांत गणणें जरूर आहे. जितका कोणी हा अनिश्चितार्थक आहे तितके च एक, अमुक, फलाणा, हे शब्द अनिश्चित आहेत.

पाणिनीनें सर्वादिगण केवळ विकरणदृष्टीनें वर्गिलेला आहे. सर्वेषां यानि नामानि तानि सर्वनामानि, असा पूर्वपरंपरागत अर्थ पतंजलीनें भाष्यांत दाखविला आहे खरा. परंतु तो अव्याप्त आहे. कारण सर्वादिगणांतील अंतर ह्या सर्वनामाला तो अर्थ व्यापीत नाहीं. अंतरे गृहाः व अंतरे शाटकाः या उदाहरणांत म्हणजे

बाहरचीं घरें किंवा वरून पांघरावयाचे साडे, या उदाहरणांत कोणत्या इतर नामांच्या बद्दल हा अंतर शब्द येतो ? केवळ अंतर ह्या शब्दाचीं रूपें योग व उपसंव्यान ह्या अर्थीं सर्व ह्या सर्वनामशब्दाप्रमाणें होतात म्हणून सर्वनामांत अंतर ह्या शब्दाची गणना विकरणदृष्टीनें केली आहे. तात्पर्य, सर्वादिगण केवळ विकरणदृष्टीनें बनविलेला आहे. ती दृष्टि मराठी व्याकरणास दामल्यांच्या मतें बिलकुल उपयोगी पडत नाहीं. तेव्हां राहिली अर्थदृष्टि किंवा उपयोगदृष्टि. ह्या दृष्टीनें एक, अमुक, फलाणा, कांहीं, नेमका, हे शब्द सर्वनामवर्गांत गणण्यास कोणता च प्रत्यवाय दिसत नाहीं. पतंजलीला हि कित्येक सर्वनामांच्या सर्वनामत्वाबद्दल शंका आली होती व ती त्यानें नमूद हि केली आहे. प्रथम पूर्वपक्ष असा केला कीं, सर्व नामांच्याबद्दल येणारा जो शब्द तो जर सर्वनामसंज्ञक होतो हें खरें, तर उभ हा शब्द कोणत्या नामांच्याबद्दल येतो म्हणून सर्वनामवर्गांत गणला ? उत्तरपक्षः– रामा व गोविंदा या बोलण्यांत पूर्वी येऊन गेलेल्या नामांच्याबद्दल उभ हा शब्द सध्यां आम्हीं योजिला सबब उभ हा सर्वनामशब्द होय. ह्यावर पूर्वपक्षकार म्हणतो, असें जर आहे, तर रामा, गोविंदा व कृष्णा ह्या बोलण्यांत पूर्वी येऊन गेलेल्या तीन नामांच्याबद्दल त्रि ( त्रयः ) हा शब्द हि असा च योजतां येतो, आणि असे लक्षावधि संख्यावाचक शब्द मागें बोलण्यांत येऊन गेलेल्या लक्षावधि नामांबद्दल योजतां येऊन हक्कानें सर्वनामसंज्ञा पावतील. उत्तरपक्षः–आपण म्हणतां तें रास्त आहे. असे लक्षावधि संख्याशब्द सर्वनामसंज्ञक होऊं लागतील, ह्यांत संशय नाहीं. परंतु आमची सर्वनामाची व्याख्या, सर्वेषां यानि नामानि तानि सर्वनामानि, अशीच केवळ नाहीं; तर गणसूत्रपठित सर्वादिगणांत जे शब्द आले आहेत व ज्यांच्यावर विकरणाचीं कांहीं कार्यें नियमानें होतात; त्या शब्दांत उभ शब्द पठित आहे म्हणून त्याला आम्ही सर्वनामशब्द म्हणतों. सूत्रकारानें उभ शब्द सर्वादींत व सर्वनामांत येवढ्या च करितां गणला आहे कीं त्याला अकज् प्रत्यय लागतो. अव्ययसर्वनाम्नां अकच् प्राक्टेः (५–३–७१). भाष्य (१–१–२७):

( पूर्वपक्ष ) अथ उभस्य सर्वनामत्वे कोऽर्थः ?

(उत्तरपक्ष) उभस्य सर्वनामत्वे अकजर्थः पाठः क्रियते । उभकौ ।

ह्या पूर्वोत्तरपक्षांत सिद्धांत्याला असें कबूल करावें लागलें कीं, उभ हा शब्द पूर्वी बोलण्यांत येऊन गेलेल्या दोन नामांबद्दल आल्यानें जितपत सर्वनामसंज्ञेस पात्र होतो तितपत च त्रयः, चत्वारः, वगैरे अगणित शब्द मागील नामांबद्दल आल्यानें सर्वनामसंज्ञेस पात्र आहेत; इतकेंच कीं सूत्रकारानें ह्या अगणित संख्याशब्दांना सर्वनाम ही संज्ञा दिलेली नाहीं व उभ या शब्दास कांहीं विकरणकार्यास्तव दिली आहे, सबब आम्ही उभ याला सर्वनाम म्हणतों व त्रयः, चत्वारः यांना

म्हणत नाहीं. बाकी त्रयः, चत्वारः यांना सर्वनामें म्हणण्यास दुसरी कोणती हर-
कत नाहीं.

भवत् हें सर्वनाम तर प्रायः सर्व शब्दासारखें मुळीं च चालत नाहीं मग त्याची गणना सर्वनामांत कां केली, असा प्रश्न काढून त्याचें हि समाधान माष्यांत सांपडतें:—

( पूर्वपक्ष ) अथ भवतः सर्वनामत्वे कानि प्रयोजनानि ?
( उत्तरपक्ष ) भवतः अकच्छेषात्वानि प्रयोजनानि । अकच् । भवकान् ।
शेषः । स च भवांश्च भवन्तौ । आत्वं । भवादृगिति ॥

यद्यपि प्रथमादिविभक्तींत सर्व शब्दाप्रमाणें भवत् शब्दाला सर्व च कार्यें होत नाहींत; तत्रापि, अकच् वगैरे तीन कार्यें भवत् शब्दाला सर्वनामांच्या प्रमाणें होतात. सबब त्याची गणना विकरणकार्यास्तव सर्वनामांत केलेली आहे. अर्थावरून केलेली नाहीं.

उभ हें द्विवचनीं चालत असल्यामुळें विभक्तिप्रकरणीं सर्वनामकार्यें त्याचेठाईं दृश्यमान होत नाहींत, व भवत् हें विभक्तींत सर्वनामाप्रमाणें मुळीं च चालत नाहींत, अशी स्थिति असतांना हि अकजादि कार्याकरितां त्यांची गणना पाणिनीनें सर्वनामांत केली. जर हीं अकजादि कार्यें ह्या दोन शब्दांना न होतीं, तर त्यांची गणना पाणिनीनें सर्वनामांत केली नसती. आतां दामल्यांना माझा असा प्रश्न आहे कीं, अशीं कांहीं कार्यें, सर्वनामें ओळखण्याचीं साधनें म्हणून, हुडकून काढण्याचा प्रयत्न त्यांनीं केला आहे काय ? व तशीं कांहीं कार्यें सांपडलीं असतां, तीं अमुक, एक, फलाणा, वगैरेंना लागत नाहींत व मी, तो, तूं यांना लागतात, असा कांहीं भेद त्यांच्या दृष्टीस पडला आहे काय ? नसल्यास खालील एकशेष समासांचा त्यांनीं विचार करावा.

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सः | च | अहं | च | आवाम् | = तो | व | मी | आम्ही | (एकशेष द्वंद्व) |
| रामः | च | अहं | च | आवाम् | = राम | व | मी | आम्ही | (एकशेष द्वंद्व) |
| रामः | च | त्वं | च | युवाम् | = राम | व | तूं | तुम्ही | |
| ते | च | त्वं | च | यूयम् | = ते | व | तूं | तुम्ही | |
| ताः | च | त्वं | च | यूयं | = त्या | व | तूं | तुम्हीं | |
| सः | च | एषः | च | एते | = तो | व | हा | हे | |
| सः | च | एषः | च | ते | = तो | व | हा | ते | |
| सः | च | अमी | च | अमी | = तो | व | अमुक | अमुक | |
| ते | च | एके | च | एके | = ते | व | एक | एक | |

ते च कत्येके च कत्येके = ते व कित्येक कित्येक
ते च के च के = ते व कांहीं कांहीं
ते च ये च ये = ते व जे जे

एणेंप्रमाणें संस्कृतांतल्याप्रमाणें मराठींत एकशेष द्वंद्व समास होतात. त्यदादीनि सर्वैर्नित्यम् ( १–२–७२ ). मराठींत एकशेष द्वंद्व मुळीं च नाहीं असें दामल्यांनीं आपल्या शास्त्रीय व्याकरणाच्या ६१६ व ६१७ ह्या पृष्ठांत निक्षून सांगितलें आहे, तें अत्यन्त निराधार आहे. संस्कृतांत हें शेषकार्य त्यदादिसर्वनामांना होतें. म्हणजे शेषकार्य होणें ही सर्वनामत्वाचा एक खूण आहे. तशी च ती मराठींत हि सर्वनामत्वाची खूण आहे. शेषकार्य ज्या ज्या शब्दाला होईल तो तो शब्द मराठींत सर्वनामसंज्ञेस पात्र होईल. आतां संस्कृतांत त्यदादिउपगणांतील च तेवढ्या सर्वनामांना हें शेषकार्य होत असे. परंतु मराठींत तें आणीक कांहीं शब्दांना हि होतें. कारण उघड च आहे. संस्कृताला व मराठीला अडीच तीन हजार वर्षांचें अंतर पडलेलें आहे. त्या अवधींत मराठीनें महाराष्ट्री, फारसी वगैरे भाषांतून संस्कृतांत नव्हतीं अशा कांहीं सर्वनामांची कमाई केलेली आहे व संस्कृतांतील त्यदादीतर सर्वनामांना शेषकार्यक्षमत्व अनुकरणानें आणिलेलें आहे. अशा त्यदादीतर सर्वनामांचें शेषकार्य येथें दाखवितों.

हा असा आणि रामा = हे असे ( इदं पासून निघालेला अकच्क )
असा आणि रामा = असे
कसा आणि रामा = कसे
तसा आणि रामा = तसे
रामा आणि फलाणा = फलाणे
रामा आणि सारे = सारे
रामा आणि सर्व = सर्व
रामा आणि अवघे = अवघे
रामा आणि वरकड = वरकड
रामा आणि तमके = तमके
रामा, गोविंदा आणि हरएक = हरएक
रामा आणि किती = किती

असे एकशेष द्वंद्व मराठींत होतात. म्हणजे शेषकार्य ह्या शब्दांवर दृश्यमान होतें. सबब हे शब्द सर्वनामत्वावर आपला हक्क भरभक्कम पुराव्यानें बजावतात. ह्या शब्दांपैकीं अस, कस, तस, तमक, हरएक व किती हे सहा शब्द त्यदादि-

वर्गांतील इद्म्, किं, तद्, तद् + अदस् व एक या सर्वनामांपासून निघालेले असल्यामुळें, परंपरेनें च शेषकार्य होण्याळा पात्र होते. सार, सर्व, अवघ, वरकड व फलाण हे पांच शब्द मात्र मराठीनें सर्वनामवर्गांत नवीन आणिले. अमुक हा शब्द अदस् पासून निघालेला असल्याकारणानें, तो पिढीजात सर्वनाम आहे त्याला सर्वनामांच्या यादींतून दामल्यांनीं व्युत्पत्यज्ञानास्तव गाळला आहे. तमुक हा तद् + अदस् या दोन सर्वनामांपासून निघाला असल्यानें, त्याचा हि सर्वनामत्वावर वंशपरंपरेचा हक्क आहे. तात्पर्य, शेषकार्यपात्रत्व ही सर्वनामत्वाची मराठींत नियतैक खूण आहे, हा राद्धान्त. या राद्धान्तान्वयें परीक्षा करून मराठींतील सर्वनामांची यादी करण्याचें काम शालेय वैयाकरणांनीं आतां बिनधोक परंतु जपून करावें. कां कीं, व्युत्पत्यज्ञानास्तव एका सर्वनामाचीं रूपें दुसऱ्या च एखाद्या सर्वनामाचीं समजून घोंटाळा माजण्याचा संभव असतो. उदाहरणार्थ, दामल्यांचें ( व्याकरण – पृष्ठ ३९९ ) काय हें सर्वनाम घ्या. ह्याचीं तृतीयादिविभक्तींचीं रूपें कशानें वगैरे दामले देतात, व टिपेंत सांगतात कीं, कसा ह्या शब्दाचीं रूपें कायच्या प्रथमोत्तर विभक्तींत येतात. परंतु, कसा हा शब्द दामल्यांच्या मतें सर्वनाम नाहीं. मग कायचें काम करतांना तो सर्वनाम कसा होईल? ह्यावर दामले उत्तर करतात कीं, वाटेल तें म्हणावें ( व्याकरण पृष्ठ ४०० )! वाटेल तें समजून, व्याकरणशास्त्र बनत नसतें. व्याकरणशास्त्रांत निश्चित अशीं च विधानें करावीं लागतात. हें दामल्यांना समजत नाहीं असें नाहीं. तर काय ह्या सर्वनामाला विभक्तिविकरण होतें कीं नाहीं, ह्याचा विकल्प त्यांच्या मनांत घोळत आहे व कशानें वगैरे रूपें काय या शब्दाचीं नाहींत हें ध्यानांत येऊन ते बुचकळ्यांत पडले आहेत. ह्या संशयस्थितींत काय ला कसा याचीं रूपें जोडून, त्यांनीं अलगेच कसा हें सर्वनाम आहे, असें ज्ञापकतः दर्शविलें आहे. ही कबुली कांहीं लहानसहान नाहीं. परंतु, असला लपंडावीचा प्रकार करण्याची कांहीं जरूर नव्हती. कसा हें कोणत्या प्रकारचें सर्वनाम आहे, हें सिद्ध होईल व तें काय ह्या सर्वनामाहून निराळें आहे हें हि सिद्ध आहे. काय हें सर्वनाम कोणत्या स्वभावाचें आहे व त्याची वंशपरंपरा काय, हें मात्र त्यांना माहीत नाहीं. सबब, ह्या गूढ सर्वनामाचें विवेचन स्वतंत्रपणें करतों. दामल्यांच्या व्याकरणाच्या १२१, १२३, व ५७७ उ, ह्या कलमांत आम्हीं, तुम्ही, हे, इतके, असे, हीं सर्वनामें ज्या कार्यास्तव दिलीं आहेत तें कार्य एकशेष होय. तात्पर्य, अस, इतक, एवढ, वगैरे सर्वनामें आहेत. कारण, तीं शेषकार्यक्षम आहेत. फक्त दामल्यांना शेषकार्य ओळखतां आलें नाहीं इतकेंच.

---

संस्कृतांत किं हें सर्वनाम प्रश्नार्थक हि आहे व सामान्यार्थक किंवा अनिश्चितार्थक हि आहे. प्रश्नार्थक किं बहुधा एकटें योजिलें जातें. व अनिश्चितार्थक किंवा सामान्यार्थक किं चित्, चन, वा किंवा अपि ह्या अव्ययांचा जोड करून योजिलें जातें. प्रश्नार्थक किं नु ह्या अव्ययाचा वाटल्यास जोड घेतें. असे हे दोन प्रयोग किं सर्वनामाचे होतात. पैकीं प्रश्नार्थक किं चें मराठींत तिन्हीं लिंगीं विकरण येणेंप्रमाणें होतें.

## १ काय ? ?

कः गच्छति ? = काइ ( काय ) जातो ? पुरुष जातो
के गच्छंति ? = काइ ( काय ) जातात ? पुरुष जातात
कं हंति ? = तो काइ( काय ) मारतो ? पुरुष मारतो
कान् हंति ? = तो काइ( काय ) मारतो ? पुरुष मारतो
सः केन हन्यते = तो काई( काय ) मारला जातो ? पुरुषानें मारला जातो
सः कैः हन्यते = तो काई( काय ) मारला जातो ? पुरुषांनीं

कस्मै = काह्या, काई ( काय )
केभ्यः = काई ( काय )
कस्मात् = काई ( काय )
केभ्यः = काई ( काय )
कस्य = काई ( काय )
केषां = काई ( काय )
कस्मिन् = काई ( काय )
केषु = काई ( काय )

( चान्त ) किमीय = काईच ( कायच ) काह्याच

कंसांत दिलेलीं रूपें फक्त वर्तमान मराठींतील आहेत. कंसाबाहेरचीं रूपें ज्ञानेश्वरकालीन हि आहेत. काई, काय असें रूप तिन्हीं लिंगीं सातीं विभक्तींत असतें. काय हा शब्द असा स्वतंत्र चालतो. त्याला कसा ह्याची मदत बिलकुल नको. अपभ्रंशांत किम् चें काई असें रूप होतें. त्यावरून मराठी काई–काय हें रूप निघालें आहे.

## २ कोण ?

प्रश्नार्थक कोण किं नु ? ह्या दोन शब्दांपासून अपभ्रंशांतील कवणु या रूपाच्या

द्वारा मराठींत आला आहे. ज्ञानेश्वरकालीं ह्याचीं तिन्हीं लिंगीं रूपें निरानिराळीं होत. कवण ( पुं. ), कवणी ( स्त्री. ), कवणें ( नपुं. ). प्रस्तुत कालीं हें तिन्हीं लिंगीं एकसारखें चालतें.

### ३ कोणत ? ( तो–ती–तें )

हें जोड सर्वनाम आहे. ह्यांत एकंदर तीन शब्द आहेत. कः + नु + त्यद् = कोणत. ( पुं. ) कोणतो, ( स्त्री. ) कोणती, ( नपुं. ) कोणतें.

हीं तीन प्रश्नार्थक सर्वनामें किम्‌पासून निघतात. आतां किम् पासून निघणाऱ्या अनिश्चितार्थक सर्वनामांची परंपराः—

### ४ कांही

किमपि = काई + हि = कांही

हें तिन्हीं लिंगीं येणेप्रमाणें वर्तमान मराठींत चालतें.

प्र. कांही – कांही

द्वि. कांहीला – कांहींला

तृ. कांहीनें – कांहींनीं

इ. इ. इ.

### ५ कोणी

हें कः अन्य ह्यांच्यापासून निघतें.

### ६ कोण

हें कः चन ह्यांच्यापासून निघतें.

प्र. कोण

द्वि. कोणा–कोणाला–कोणां–कोणांना

तृ. कोणें–कोणीं

बाकीं रूपें कोणीप्रमाणें.

**काय** ( अव्यय ) किं पासून.

**कायनु** किं नु पासून हें अव्यय निघतें. ह्याचा प्रचार आशिष्टांत फार.

किं पासून कियत्, कति वगैरे शब्द निघाले, त्याचे पासून खालील मराठी शब्द येतातः—

कियत् = केवढ
कति = किति
कतिक = कितीक
कति एक = कित्येक
कति = कइ
कतिक = कइक, कैक
कतम = कायतें, कोणतें
कतिधा = कितिदां
कीदृश = काईस ( सा – सी – सें ), कैस, केसं.

इ. इ. इ.

ह्या कस चीं रूपें कसा, कशी, कसें, अशीं तिन्ही लिंगीं आकारान्त, ईकारान्त व एकारान्त चालतात. पैकीं आकारान्त कसा चीं रूपें दामल्यांनीं काय ला चिकटविलीं आहेत. ह्याहून जास्त गूढ ह्या काय सर्वनामांत नाहीं.

---

## ( १७ )

### आपण

( १ ) संस्कृत आत्मन् पासून महाराष्ट्री अप्पाण व त्यापासून मराठी आपण

स आत्मा गच्छति = आपण जातो
ते आत्मानः गच्छंति = आपण जातात
त्वं आत्मा गच्छसि = आपण जातोस
यूयं आत्मानः गच्छथ = आपण जातां
अहं आत्मा गच्छामि = आपण जातों
वयं आत्मानः गच्छामः = आपण जातों

प्रथमेच्या एकवचनीं व अनेकवचनीं आपण ह्याचा प्रयोग एणेंप्रमाणें होतो. म्हणजे आपण हा शब्द मी आम्हीं, तूं तुम्ही, तो व ते, या साही सर्वनामरूपांबद्दल एकटा च योजिला जातो. आदरार्थ किंवा उत्कट स्वार्थ दाखवावयाचा असला म्हणजे आपण हें सर्वनामांचें सर्वनाम योजिलें जातें. उत्कट स्वार्थी आपण जेथें योजिला जातो, तेथें त्याला दामले आत्मवाचक म्हणतात; व आदरार्थी जेथें योजिला जातो तेथें त्याला प्रथमद्वितीयपुरुषीं व अनेकवचनीं चालणारा पुरुषवाचक म्हणतात. तात्पर्य, पुरुषवाचक आपण शब्द निराळा व आत्म-

वाचक आपण शब्द निराळा, असें दामले म्हणतात. परंतु तसा भेद करण्याचें कांहीं कारण नाहीं. कां कीं आपण ह्या शब्दाचे जात्या च उत्कट स्वार्थ व आदर असे दोन अर्थ मराठींत आहेत. मी, तो, तूं ह्या हून उत्कट मीपणा, तूंपणा किंवा तोपणा दाखवावयाचा असला म्हणजे त्यांच्याबद्दल आपण योजतात. अहंपणा भासतो, म्हणून प्रथमपुरुषीं आपण ह्याला आदर हा अर्थ प्रायः नसतो, केवळ औत्कट्य हा एक च अर्थ असतो. द्वितीय व तृतीय पुरुषीं मात्र आदर संभवतो; सबब त्या दोन्हीं पुरुषीं आपण हें आदरार्थीं हि योजिलें जाऊं शकतें.

( २ ) आतां, मी, तूं, तें व आपण ह्या चार शब्दांवर, सर्वनाम ओळखण्याची खूण जें शेषकार्य, तें कसें चालतें तें पाहूं. म्हणजे वैयाकरणांचा पुष्कळ गैरसमज दूर होईल.

मी व तूं = आम्ही ( एकशेष द्वंद्व )
मी व तो = आम्ही ( ,, ,, )
तूं व तो = तुम्ही ( ,, ,, )
( मी ) आपण व तूं = आपण ( ,, ,, )
(आम्ही) आपण व तुम्ही = आपण ( ,, ,, )
( तुम्ही ) आपण व ते = आपण
( तुम्ही ) आपण व मी = आपण ( आम्ही या अर्थी आदरानें )
तुम्ही, ते, व आपण = आपण

इ. इ. इ.

तात्पर्य, अशा स्थलीं, आम्ही, तुम्ही व आपण हे एकशेष द्वंद्व समास आहेत. पैकीं आपण ह्या समासाला दामले पुरुषवाचक असें स्वतंत्र सर्वनाम समजतात, तें अर्थात् अयुक्त आहे. एकशेष द्वंद्व समास मराठींत आहे हें ठाऊक नसल्यामुळें, व शेषकार्य पात्रता ही सर्वनामत्वाची नियतैक खूण आहे ह्या गोष्टीचा पत्ता हि नसल्यामुळें, हा गोंधळ दामल्यांच्या हातून घडला, हें उघड आहे. प्रत्ययांचे, शब्दांचे, समासांचे, धातूंचे वगैरेंचे उगम माहीत नसल्याकारणानें दामल्यांनीं अनेक अपविधानें व अपक्क उद्घाटनें व कच्चीं विवेचनें स्थलोस्थलीं केलीं आहेत. त्या प्रत्येकाचें निरसन करण्याचें म्हटलें म्हणजे उगाच व्यर्थ लिखाण मात्र वाढवावें लागतें. सबब, दिग्दर्शनमात्र करून पुढें जातों.

( ३ ) आत्मा आत्मानं हंति = आपण आपणास मारतो ( स्वतास )
स आत्मानं हंति = तो आपणास मारतो ( स्वतास )
ते आत्मानं घ्नति = ते आपणास मारतात ( स्वतास )
ताः आत्मानं घ्नति = त्या आपणा स्वतास मारतात

प्रांयः संस्कृतांत आत्मन् शब्द पुल्लिंगीं एकवचनीं चालतो. मराठींत आपण हें रूप तिन्हीं लिंगीं मात्र सारखें चालतें, परंतु वचनभेद होतो. ही वचनभेदाची लकब मराठीनें महाराष्ट्रींतून व अपभ्रंशांतून घेतलेली आहे.

( ४ ) आपसात हें रूप आत्मसात् ह्या संस्कृत रूपापासून मराठींत आलें आहे. हिंदीशीं कांहीं संबंध नाहीं.

हें काम आपसात करा = इदं कर्म आत्मसात् कुरुत

आपसात करा म्हणजे आपणा सर्वांवर घ्या

हें अन्न आपसात वाटा = इदं अन्नं आत्मासात् वंटयत

आपसात वाटा म्हणजे आपणा सर्वांत वाटून घ्या

( ५ ) दामले ज्या रूपांना षष्ठी म्हणतात व ज्यांच्या अन्तीं च हा प्रत्यय असतो ( दामले या प्रत्ययाला चा म्हणतात ) तीं रूपें आपण ह्या शब्दापासून कशीं निघतात ? दामल्यांच्या षष्ठीचा च ( चा – ची – चें ) प्रत्यय आपण या शब्दाला कां लागत नाहीं ? दामल्यांच्या व्याकरणानें, खरें पाहिलें तर. आपणाचं ( चा – चीं – चें ) असें रूप षष्ठीचें व्हावें. परंतु तें तसें दामल्यांच्या मतें होत नाहीं, हें दामल्यांना कबूल आहे. दामले लिहितात, आपण ह्या शब्दाची षष्ठी आपला. म्हणजे ल किंवा दामल्यांच्या चुकीच्या परिभाषेनें ला हा षष्ठीचा प्रत्यय झाला. आणि तो तर त्यांनीं आपल्या व्याकरणांत षष्ठीचा प्रत्यय म्हणून कोठें च निर्देशिला नाहीं. तेव्हां ह्या प्रत्ययाचा छडा लाविला पाहिजे व ह्याचा खरा उगम हुडकिला पाहिजे.

( अ ) आत्मन् या शब्दापासून महाराष्ट्रींत अप्प असें रूप होतें व ह्या अप्प ला स्वार्थक उल्ल हा प्रत्यय लागून अप्पुल्ल असें रूप होतें. ह्या अप्पुल्ल पासून मराठी आपुल ( ला – ली – लें ) किंवा आपल ( ला – ली – लें ). आपल म्हणजे केवळ आत्मन्.

तो आपला तेथें आहे

ती आपली निघून गेली

ते आपले माशा मारीत बसले

या वाक्यांत आपला, आपली, आपले, हीं प्रथमेचीं रूपें आपल या शब्दाचीं आहेत व तीं तो, ती, ते यांशीं समाधिकृत आहेत. ह्या आपल ( ला – ली – लें ) शब्दाची दामल्यांनीं निरर्थकांत गणना केली आहे.

( आ ) आत्मन् शब्दाला य प्रत्यय लागून आत्म्य असें तद्धित होतें. त्याचें प्राकृत अप्पिल असें होऊन मराठींत आपिल – आपल ( ला – ली – लें ) हीं

रूपें साधतात. इतर बहुतेक शब्दांत य पासून च मराठींत होतें. परंतु मध्यं व आत्म्य ह्या शब्दांचीं मज्झ व अप्प अशीं रूपें होऊन व नंतर त्यांना इल्ल प्रत्यय लागून मज्झिल्ल व अप्पिल्ल अशीं रूपें साधतात व ह्या शेवटच्या रूपांववरून मधल ( ला – ली – लें ) व आपल ( ला – ली – लें ) हीं रूपें साधतात. हा आपल ( ला–ली–लें ) शब्द नाम किंवा विशेषण आहे व तत्संबंधक आहे. तात्पर्य आपण याची षष्ठी आपल नाहीं. आपल हा शब्द आत्म्य ह्या तत्संबंधक शब्दापासून निघालेला आहे व तो विशेषण किंवा नाम आहे. उदाहरणें सुलभ आहेत.

---

## ( १८ )

### ' स्वतः

हा शब्द संस्कृतांतल्या प्रमाणें च मराठींत अव्यय आहे. परंतु, दामले म्हणतात त्याप्रमाणें हा नाम नाहीं. ह्याला नाम कां म्हणावयाचें, तर, दामले सांगतात त्याला विभक्तिविकरण होतें म्हणून ! ही शास्त्रीयपद्धति नाहीं, शास्त्रीय पद्धतीची थट्टा आहे.

वस्तुस्थिति अशी आहे कीं दामले येथें निरनिराळ्या दोन शब्दांना एक च मानीत आहेत. स्वतः हा शब्द निराळा व स्वता हा शब्द निराळा. स्वतः हें अव्यय आहे व स्वता हें नाम आहे. दामले समजतील कीं स्वता हें पुल्लिंग आहे. तर तसें नाहीं. स्वता हें स्त्रीलिंग आहे. स्व हा शब्द संस्कृतांत मी, तो, तूं या सर्वनामांचें सर्वनाम आहे म्हणजे ह्यांच्या आवृत्तीबद्दला तें योजिलें जातें, म्हणजे तें त्या त्या सर्वनामांची तत्ता दाखवितें. ह्या स्व सर्वनामशब्दाला ता हा भाववाचक प्रत्यय लागून स्वता हें स्त्रीलिंगी भाववाचक नाम झालें. त्याचा उपयोग मराठींत येणें-प्रमाणें होतोः—

मी घराचा स्वता मालक आहे = अहं गृहस्य स्वतया स्वामी अस्मि

येथें स्वता ही तृतीया आहे. आकारान्त स्त्रीलिंगी शब्दांची तृतीया ज्ञानेश्वर-कालीं अशी होत असे.

मी स्वतास ह्मणतो = अहं स्वतां संभणामि

येथें स्वतास द्वितीया आहे मी आपल्या अहंपणास उद्देशून म्हणतो.

मी स्वताशीं लबाडीनें वागतों = अहं स्वतया समम् आपलाव्येन वर्तामि

येथें स्वताशीं ही तृतीया+शीं आहे. मी आपल्या अहंपणाशीं लबाडीनें वागतो.

मी स्वता पाशीं पैसे ठेवतों = अहं स्वतायाः पार्श्वे द्रव्यं निदधामि

येथें स्वता ही षष्ठी आहे.

मी स्वताचें हित पहातों = अहं स्वतीयं हितं पश्यामि

येथें स्वताचें हें विशेषण आहे.

मी स्वतांत ब्रह्म पहातों = अहं स्वतायां ब्रह्म पश्यामि

येथें स्वतांत सप्तमी आहे.

माकड स्वता शहाणें असतें = मर्कटं स्वतया शिक्षणीयं अस्ति
ती स्वता मुखत्यार आहे = सा स्वतया स्वाम्यं करोति
ते स्वता राजे आहेत = ते स्वतया राजानः संति
त्यानीं स्वतां हें काम करावें = तैः स्वतया इदं कर्म कर्तव्यं
दूध स्वता गोड असतें = दुग्धं स्वतया स्वादु वर्तते

मी स्वतः मारतो = अहं स्वतः मारयामि ( व्याघ्रादीन् )

येथें स्वतः हें अव्यय आहे.

मी स्वतास मारतो = अहं स्वतां संमारयामि

येथें स्वतास द्वितीया आहे. मी आपल्या अहंभावविशिष्ट जें शरीर त्यास मारतो.

असे आणीक शेकडों प्रयोग देतां येतील. तात्पर्य, स्वतः हें अव्यय आहे व स्वता हें भाववाचक नाम आहे. आणि दोनी हि सर्वनामें नाहींत.

---

## ( १९ )

## पाणिनीय सर्वनामें

पाणिनीय सर्वनामें घेऊन त्यांतील मराठींत कोणतीं उरलीं आहेत तें दाखवितोंः—

१ त्यद् = च ( चा – ची – चें )
२ त्यद् = त ( ता – ती – तें )
३ तद् = त ( तो – ती – तें )
४ यद् = ज ( जो – जी – जें )
५ एतद् = ह, ए ( ज्ञानेश्वर ) ह्यानें
६ इदम् = य, य ( ज्ञानेश्वर ) यानें
७ अदस् = अमुक, अस

८ एक = एक
९ द्वि = दोन्न
१० युष्मद् = तूं
११ अस्मद् = मी
१२ भवतु = बाबा ( सर्वनाम नाहीं )
१३ किम् = काय
१४ किमपि = कांहीं
१५ किम् नु = कोण ?
१६ किंचन = कोण
१७ किं अन्यन् = कोणी
१८ स्वं = सुक. स्वतः, स्वता (सर्वनाम नाहीं), सख्ख, सग.
१९ सर्व = सर्व
२० सर्व = सार ( रा – री – रें )
२१ विश्व = ०
२२ उभय = उभ ( भा – भी – में ) सर्वनाम
२३ उभ = उपभयतः, उभयता, उभयत्र
२४ कतर = कोणीतरी, काहीतरी, कांहींतर, कोणतर
२५ ततर = तोतरी, तोतर
२६ यतर = जोतरी, जोतर
२७ इतर = येर ( ज्ञानेश्वर ), इतर, यर
२८ अन्यतर = न्यार, निराळ ( स्वार्थक आल )
२९ कतम = कोणतो
३० ततम = तोतो
३१ यतम = जोजो
३२ अन्य = आणिक, आन अन्य
३३ त्वत् = तो – ती – तें
३४ त्व = तो – ती – तें
३५ नेम = नेमक ( का – की – कें ), निम ( मा – मी – में )
३६ सम = समध ( धा – धी – धें ), समंध ( धा – धी – धें )
३७ सिम = सिमध ( धा – धी – धें )

पूर्व, अपर, अवर, दक्षिण, उत्तर, अपर, अधर, हीं मराठींत सर्वनामें नाहींत, अंतर व बाहिस् हीं हि मराठींत सर्वनामें नाहींत.

आतां, सर्वनामत्वाची जी दुसरी एक खूण अकच्कार्य तें ह्या प्रत्येक सर्वनामाला लागून मराठींत साकच्क रूपें कशीं होतात तें पहाण्यासारखें आहे. पैकीं, अदस् सर्वनाम प्रथम घेतों.

( १ )

अनकच्क रूपें

अदस्

| | |
|---|---|
| १ असौ | अमी |
| २ अमुम् | अमून् |
| ३ अमुना | अमीभिः |

साकच्क रूपें

| | |
|---|---|
| १ असकौ / अमुकः | अमुके |
| २ अमुकम् | अमुकान् |
| ३ अमुकेन | अमुकैः |

साकच्क अदस् ह्या सर्वनामाचीं दोन अंगें होतात. एक असक व दुसरें अमुक. आणि ह्या दोन अंगांपासून मराठींत अस ( सा-शी-सें ) व अमुक ( का-की-कें ) हीं दोन सर्वनामें उत्पन्न होतात. ईदृश व एतादृश या शब्दापासून ऐस ( सा-सी-सें ज्ञानेश्वर ) या रूपाच्या द्वारा जो अस ( सा-शी-सें ) शब्द त्याहून हा साकच्क अदस् सर्वनामापासून निघालेला अस ( सा-शी-सें ) सर्वनामशब्द निराळा आहे.

असौ च देवदत्तः च रामः च अमी = असा व देवदत्त व राम असे
रामः च गोविंदः च अमू = रामा व गोविंदा असे

ह्या अदस् सर्वनामापासून प्राकृतद्वारा ( असौ = अहो ) ह ( हा-ही-हें ) हें सर्वनाम मराठींत आलें आहे.

असौ च रामः च अमू = हा व राम हे किंवा असे

तात्पर्य ह, अस व अमुक हीं तीन सर्वनामें अदस् चा संस्कृत सर्वनामापासून मराठींत आलीं आहेत. हीं तिन्ही विप्रकृष्टार्थी संस्कृतातल्याप्रमाणें मराठींत योजतात. संस्कृतांत अदस् व तद् हीं विप्रकृष्टार्थक सर्वनामें आहेत. त्यामुळें, तदुत्पन्न ह ( हा-हा-हें ) व त ( तो-ती-तें ) हीं दोन्हीं विप्रकृष्ट अर्थ मराठींत दाखवितात. हें विप्रकृष्टार्थक ह ( हा-ही-हें ) सर्वनाम सन्निकृष्टार्थक ह ( हा-ही-हें ) सर्वनामाहून निराळें आहे. सबब त्याची व्युत्पत्ति पुढें करतो.

५

( २ )

इदम्

अनकच्क

अयं इमे

इमं इमान्

साकच्क

अयकं इमके

इमकं इमकान्

ज्ञानेश्वरकालीं इदं पासून प्रथमेंत ह, ईव प्रथमेतरविभक्तींत इय, इ, अशीं अंगें होत. इहीं, इयेतें, इया, हा, ई, एं, हें, इत्यादि.

वर्तमान मराठींत इदं पासून प्रथमेंत ह व प्रथमेतरत्र य व इ हीं अंगें होतात. हा, हीं, हे व यानें, इनें, इत्यादि.

हें ( ह, इ, य ) सर्वनाम सन्निकृष्ट अर्थ दाखवितें.

साकच्क इदकस् पासून अयकं द्वारा हाएक ( हायक ), हीएक, हेंएक, हीं सर्वनामें मराठींत उत्पन्न झालीं आहेत. अज्ञातार्थी किंवा कुत्सितार्थी अकज् होतो. मराठींत हि तो च अर्थ होतो.

हीं बाई आली आहे = इयं स्त्री आगता ( ज्ञाता, निश्चित )

हीएक बाई आली आहे = इयकं स्त्री आगता ( अज्ञाता, कोणी तरी )

हें साकच्क रूप मराठी वैयाकरणांनीं ओळखिलें नाहीं.

( ३ )

एतद्

एषः एते

एतं एतान्

ज्ञानेश्वरकालीं एतद् पासून ( अपभ्रंश एह ) द्वारा प्रथमेंत ह ( हा–ही–हें ) व इतरत्र एय अशीं अंगें होत. हा, एया, इत्यादि.

विद्यमान मराठींत प्रथमेंत ह व इतरत्र ह्या होतें.

हा ह ( हा–ही–हें ) समीपतरार्थ दाखवितो.

येणेंप्रमाणें तीन निरनिराळ्या उगमांपासून ह ( हा–ही–हें ) सर्वनाम मराठींत आलें आहे. पैकीं एतदुत्पन्न ह समीपतरार्थ, इदमुत्पन्न ह संनिकृष्टार्थ, व अदसुत्पन्न ह विप्रकृष्टार्थ दाखवितो. हे विप्रकृष्टार्थक ह विप्रकृष्टतर अर्थ दाखविणाऱ्या तदुत्पन्न तो या सर्वनामाबद्दल सहज च योजिलें जातें.

हीं खडेंघाशांचीं पोरें रोड व किरटीं निपजतात. त्यांना अन्न खावयास मिळत नाहीं. हें घर मोडलें आहे, त्याला नीट केलें पाहिजे.

येथें ह बद्दल त योजिलेलें आहे. कारण दोन्ही विप्रकृष्टार्थ दाखवितात.

हा मी आलों = एषः अहं आगतः

एथें हा समीपतरवर्तित्व दाखवितें. दामले म्हणतात, त्याचा इथें क्रियाविशेषणासारखा उपयोग केला आहे. परंतु तसा कांहीं प्रकार नाहीं. येथें हा समीपतरवर्ति सर्वनाम आहे.

एषः अहं = हा मी = समीपतरवर्तित्व
इदं पत्रं = हें पत्र = सन्निकृष्टत्व
अदः पत्रं = हें पत्र = विप्रकृष्टत्व
अदकस् पत्रं = असें पत्र = विप्रकृष्टत्व, कुत्सितत्व
अदकस् पत्रं = अमुक पत्र = विप्रकृष्टत्व, अज्ञातत्व, कुत्सितत्व

( ४ )

अस, कस, जस, तस

अदकस् = अस ( सा – शी – सें )
क अदकस् ( कः असकौ )= कस ( सा – शी – सें )
य अदकस् ( यः असकौ )= जस ( सा – शी – सें )
त अदकस् ( सः असकौ )= तस ( सा – शी – सें )
असा माणूस येत आहे, पहा= असकौ मनुष्यः आयाति, पश्यतात्

कः असकौ = कसा ( माणूस )
यः असकौ = जसा ( माणूस )
सः असकौ = तसा ( माणूस )

हीं अकजुत्पन्न अस, कस, वगैरे दृशाद्युत्पन्न अस, कस, इत्यादिंहून निराळीं आहेत.

हा मुलगा, हा मुलगा आणि हा मुलगा = अयं बालकः, एष बालकः, असौ बालकः

तो मुलगा = सः बालकः

ज्ञानेश्वरकालीं असक ( का – की – कें ) असें अकच्क रूप होत असे.

ज्याचे हातांत खड्ग आहे व ज्याचें रूप भयंकर आहे, असा मनुष्य आला = यस्य हस्ते खड्गं वा यस्य रूपं भयंकरं असकौ मनुष्यः आयाति

असकौ = सः ( विप्रकृष्ट अर्थ दोन्ही दाखवितात ).

तो याचा अनुसंबंधी असा हें दामले, ओळखतात ( पृष्ठ ११७-११८ ). परंतु असा हें सर्वनाम आहे, हें दामले ओळखीत नाहींत.

( ५ )

ईदृश = अयस ( सा-शी-सें ) = ऐस = अस
एतादृश = आयस = ऐस = अस
अमूदृश = असास ( सा-शी-सें )
तादृश = तैस = तस
यादृश = जैस = जस
कीदृश = कैस, कायस, काहीस, काइस – कस
सदृश = सरिस ( सा – शी – सें )
( मत्सदृश ) मादृश = मजसरिस
हीं असास, ऐस, तैस इत्यादि रूपें सादृश्यार्थ दाखवितात.

( ६ )

एक

( अकच्क ) एकक = एकक
एकतर = ( त्यांतून ) एकतर
एकतम = ( त्यांतून ) एकतो, एकती, एकतें

( ७ )

दोघ

द्वकौ = दोघ, दोघे, दोघै ( ज्ञानेश्वर ), दोह
द्वौ अमू = दोघ असे = दोघेसे

( ८ )

( अकच्क ) किम् = कायकी
किमपि = काहीक
किंनु = कोणीक
कोणी व्यापारी होता = कश्चन व्यापारी अभूत्
कोणिक व्यापारी होता = कश्चन व्यापारी अभूत् (अकच्क)
काहीक पदार्थ हवा = किमपि वस्तु भाव्यं ( अकच्क )

कोणीक, काहीक हीं कोणीएक, कांहींएक ह्या रूपांहून निराळीं.

( ९ )

स्व

( अकच्क ) स्वक ( कः, का, कं ) = सुक ( का–की–कें )

तो सुका–खा आला = सः स्वकः आगतः

ती सुकी–खी आली = सा स्वका आगता

तें सुकें–खें. = तत् स्वकं आगतं

तो अपसुका आला = सः आत्मस्वकः आगतः

ती आपसुकी–का आली= सा आत्मस्वका आगता

तें आपसुकें आलें = तत् आत्मस्वकं आगतं

येथें सुख म्हणजे आनंद ह्या शब्दाचा कांहीं एक संबंध नाहीं. येथें आपसुक म्हणजे स्व. विशेष जोर दाखविण्याकरितां आत्म व स्व हें जोड सर्वनाम योजिलें आहे.

स्वक = सग ( गा–गी–गें )

सगासोयरा = स्वकः सोदरः

सगीसोयरी = स्वका सोदरा

स्वक = सख्ख ( ख्खा–ख्खी–ख्खें )

सख्खा भाऊ = स्वकः भ्राता

सख्खी बहिण= स्वका भगिनी

सख्खी आई = स्वका माता

सख्खा चुलता= स्वकः चुल्लतातः

सख्खा मामा = स्वकः मातुलः

---

( १० )

उभ ( अनेकवचन मात्र ) सर्वनाम

रामा आणि गोविंदा उभे आले = रामश्च गोविंदश्च उभौ किंवा उभकौ आगतौ

नवराबायको उभीं आलीं = पतिश्च पत्नी च उभकौ आगतौ

येथें उभे, उभीं, उभ्या हीं सर्वनामरूपें आहेत.

( ११ )

( उभय ) उभ ( भा – भी – भें ) सर्वनाम नाहीं.

उभा रस्ता = उभया रथ्या ( दोन बाजू आहेत ज्याला असा रस्ता )

उभी सभा = उभया सभा ( दोन बाजू आहेत जिला अशी सभा )
उभा हिरा = उभयः मणिः ( दोन बाजू आहेत ज्याला असा हिरा ).

उभ्या नदींत म्हणजे नदीच्या दोनी बाजूंस
उभ्या घरांत म्हणजे घरांतल्या दोनी बाजूंस

तिनें काकडी उभी चिरली = तया कर्कटिका उभया शीर्णा
ती चोळी उभी शिवते = सा चोलिकां उभयां सीव्यति
ती लुगडें उभें फाडते = सा वस्त्रं उभयं पाटयति

परंतु

ऊर्ध्व = उभ

तो उभा आहे = सः ऊर्ध्वः अस्ति
ती उभें शिवते = सा उर्ध्वं सीव्यति

ऊर्ध्वार्थी उभ पार्श्वद्वयार्थक उभ हून निराळें.
उभयता याचा उपयोग स्वता सारखा.

उभयतः हें अव्यय.

( १२ )

कतर

कतरः याति ? = कोणतर येतो ?
द्वयोः कतरः यातु = दोहोंतून कोणीतरी जावो
एतयोः कतरत् देहि = ह्या दोहोंतून काहीतर दे

येथें तर म्हणजे तन्हि नव्हे

( १३ )

ततर

तयोः ततरः अपिबत् = त्या दोहोंपैकीं तोतर प्याला
ततरत् देहि = तेंतर दे
ततरा गता = तीतर गेली ( दोघींपैकीं )

संस्कृतांत तर नंतर लिंगप्रत्यय लागतात; मराठींत तर च्या अगोदर लागतात.

( १४ )

युवयोः यतरा आगच्छति ततरा आगच्छतु = तुम्हा दोहोंतून जीतर यइल तीतर येवो.

( १५ )

इतर

यर, येर हीं रूपें ज्ञानेश्वरकालीन. इतर विद्यमानकालीन.

( १६ )

युष्मासु कतमः आयातु = तुम्हांतून कोणता किंवा कोणचा येऊं द्या

एतत्सु कतमत् इष्यते = ह्यांतून कोणतें किंवा कोणचें हवें

एतत्सु कतमत् गृहाण = ह्यांतून कायतें घे

कोणतो ह्याहून कोणता निराळा

दामले ह्या सर्वनामाला विशेषण म्हणतात ! ( ११९ )

( १७ )

तत्सु ततमत् विचिनु = त्यांतून तेंतें वेंच

तेषु ततमः आगच्छतु = त्यांतून तोतो येऊं द्या

ततमाः स्त्रियः आगता = त्यात्या बाया आल्या

दामले ( पृष्ठ ११७ ) ह्या तेंतें, त्यात्या व तोतो यांस साकल्यार्थक द्विरुक्त सर्वनामें म्हणतात !

उगम माहीत नसल्यामुळें, कांहींतरी म्हणावें झालें !

( १८ )

यतमत् इष्टं ततमत् गृह्यताम् = जेंजें इष्ट तेंतें घ्यावें

यतमः कालातिपातं कुर्यात् ततमः दंड्येत = जोजो उशीर करील त्यालात्याला शिक्षा होईल.

यतम = जोजो

यश्च कश्चन = जो कोणी

यश्च स च = जो तो

जोजो हून जो तो हे अनुसंबंधक शब्द निराळे आहेत.

( १९ )

आन ( ज्ञानेश्वर ), आणिक ( साकचक्र ), अन्य, ह्यांचे उपयोग प्रसिद्ध आहेत.

( २० )

त्व, त्वत् ( अन्यार्थक )

ते असें म्हणतात, ते असें म्हणतात = ते अदः भणंति, त्वे अदः भणंति दुसऱ्या ते चा अर्थ अन्य असा आहे.

एक, अन्य व ते हीं तीन सर्वनामें मराठींत व संस्कृतांत समानार्थक आहेत. तदुत्पन्न तो निराळा व त्वदुत्पन्न किंवा त्वोत्पन्न तो निराळा. तो – एक असें म्हणतो, तेएक असें म्हणतात. येथें त्वकन् या अकच्क रूपापासून ( तेक, तोक ) तेएक तोएक हीं सर्वनामें निराळीं आहेत. तोएक म्हणजे अन्यकोणी.

( २१ )

नेम

नेम ह्या सर्वनामाचे अर्थ दोनः ( १ ) कांहीं, ( २ ) अर्ध. पैकीं दुसरा अर्थ सामान्यतः संस्कृत व्याकरणांतून देतात, दोन्ही अर्थीं मराठींत ह्या नेम पासून निरनिराळे शब्द साधले आहेत. कांहीं या अर्थीं नेमक ( का–की–कें ); व अर्ध या अर्थीं निम ( मा–मी–में ).

( सं. ) नेमके ( अकच्क ) लोकाः = ( मराठी ) नेमके लोक ( Certain definite people )

Certain ह्या शब्दाचे इंग्रजींत definite व indefinite असे दोन अर्थ आहेत. पैकीं definite some या अर्थीं नेम हें संस्कृत सर्वनाम आहे.

नीम ( अर्धा ) हा शब्द फारसींत हि आहे. परंतु, संस्कृतांत त्याहून हि तो प्राचीन आहे. सव्व, नीम, निमकी, या शब्दांतील नीम संस्कृतोत्पन्न समजणें भाग आहे.

( २२ )

सम, सिम ( सर्वार्थक )

समक ( अकज् ) = समग = समध – द = सचंध – द
सिमक = सिमग = सिमध – द
ग चा ध – द होत आहे.

समध – द, सिमध – द हीं सर्वनामें अशिष्ट अद्याप योजतात.

सचंध – द हें अपभ्रष्ट रूप सध्यां मराठींत शिष्ट समजलें जातें.

समके जनाः = { समदे लोक ( अशिष्ट )
सचंद सारे लोक ( शिष्ट ) }

सिमके जनाः = सिमदे लोक ( अशिष्ट )

शिष्टांत हा उच्चार व शब्द नाहीं.

( २३ )

ईयत्तरं = इवलेतर – री ( अपि )

तावत्तरं = तेवढेंतरीं – र
कियत्तरं = केवढेंतरी – र
इयत्तमं = इवलेंतें
तावत्तमं = तेवढेंतें
कियत्तमं = केवढेंतें
यावत्तमं = जेवढेंतें

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्वक्रम
अनुक्रम ........................ वि: ....................
स्थळ ........................ नों दि ....................

इत्यादि अनेक ठिकाणीं मराठींत डतरडतमोत्पन्न तर व त हे प्रत्यय लागतात. हे तरतमभाव दाखविणाऱ्या तर व तम प्रत्ययांहून निराळे आहेत. व तरी व तर, किंवा तों व तवं या अव्ययांहून निराळे आहेत.

( २४ )

### कुत्सितार्थक अकज्

संस्कृतांत अकज् कुत्सितार्थी सर्वनामांना, अव्ययांना व क्रियापदांना लागतो. तसा मराठींत हि लागतो. पैकीं सर्वनामांच्या व क्रियापदांच्या अकज् चें दिग्दर्शन येथें करितों.

सः अन्नं पचति = तो अन्न शिजवतो ( साधा प्रयोग )
सः अन्नं पचतकि = तो अन्न शिजवतोय् ( अकच्क प्रयोग )
यथाकथा पचतकि = कसेंतरी शिजवतोय्
सः अन्नं अपचकत् = त्यानें अन्न शिजविलेंय्

पचतकि म्हणजे कुत्सितं पचाति

शिजवतोय् म्हणजे वाईट शिजवितो

बटुः पाठं करोतकि = पोर अभ्यास करतेंय् ( कुत्सितार्थ )
गुतरं गवत्तं अत्तकि = गुरूं गवत खातँय् ( कुत्सितार्थ )

संस्कृतांत अकज् प्रमाणें मराठींत कुत्सितार्थी य् प्रत्यय क्रियापदरूपांना लागतो.

त्वं कर्म करोषकि = तूं काम करतोसय् ( कुत्सितार्थ )
कः कोत्र भोः ! अहकम् = कोण आहे हो ? मीय् ( अज्ञातार्थ )
त्वकं आगछसि = तूय् येतोस

हा कुत्सितार्थक किंवा अज्ञातार्थक अकज् संस्कृतभाषा ज्या वेळीं बोलण्यांत होती त्या वेळीं नित्याच्या प्रचारांतला होता. ग्रांथिक संस्कृतांत हे प्रयोग येत नाहींत. त्याप्रमाणें च नित्याच्या घरगुती बोलण्यांत मराठींत कुत्सितार्थक व अज्ञातार्थक य् प्रत्यय येतो. ग्रांथिक मराठींत येत नाहीं. पाणिनीच्या सूक्ष्म दृष्टींतून

हे घरगुती परंतु शिष्ट प्रयोग सुटले नाहींत. आमच्या मराठी वैयाकरणखसूचींच्या स्थूल नेत्रांस स्थूल प्रयोग हि दिसतनात, मग घरगुती सूक्ष्म प्रयोग कोठून दिसणार !

येणेंप्रमाणें संस्कृतांतून मराठींत आलेल्या सर्वनामादिक शब्दांची परंपरा आहे. विभक्तिकार्य, शेषकार्य, अकचकार्य व आत्वकार्य इतक्या च्यार कार्यांतून कोणत्या ना कोणत्या तरी कार्यांच्या साधर्म्यावरून सर्वादि सर्वनामगण पाणिनीनें रचिलेला आहे. इतकें च नव्हे तर केवळ एका शीकार्यास्तव प्रथमादि (१–१–३३) शब्दांना सर्वनामसंज्ञा पाणिनीनें तेवढ्यापुरती दिली आहे. आतां, दामल्यांची सर्वनाम-व्याख्या घेतली, तर ती मी, तूं, ते वगैरे अकरा च शब्दांना तेवढी लागते असें नाहीं. तर ती इतर अनेक शब्दांना लागते. परंतु, ते इतर अनेक शब्द वगळून, दामल्यांनीं अकरा च तेवढे शब्द सर्वनामसंज्ञेस पात्र, काय साधर्म्य पाहून, केले तें त्यांचें त्यांस माहीत. पाणिनीप्रमाणें कांहीं कार्यसाधर्म्य हि दामले सांगत नाहींत. तेव्हां, कांहींतरी करावयाचें म्हणून त्यांनीं हा अकरांचा वर्ग बनविला आहे असें म्हणावें लागतें. तात्पर्य, दामल्यांचें हें सर्वनामप्रकरण अत्यन्त व पराकाष्ठेचें अशास्त्र आहे. कित्येक सर्वनामें त्यांनीं ओळखिलीं नाहींत, कित्येक सर्वनामें त्यांना सांपडलीं नाहींत, कित्येक सर्वनामांना त्यांनीं षष्ठीचे प्रत्यय ठरविले, कित्येक सर्वनामांची गफलत केली आहे, कित्येक सर्वनामांना क्रियाविशेषणांत काढिलें आहे, आणि एकाचीं रूपें दुसऱ्या च सर्वनामाला चिकटविलीं आहेत. हा गोंधळ एकट्या दाम-ल्यांनीं च तेवढा केला आहे, असें नव्हे. इतरांचा तर येथूनतेथून सगळा च गोंधळ आहे. त्या सर्वांत दामल्यांचा गोंधळ अंमळ कमी. परंतु हा जो कमी गोंधळ तो हि पराकाष्ठेचा आहे, असें म्हटल्यावांचून गत्यन्तर नाहीं. मराठीचें व्याकरण रचावयाला जावयाचें आणि संस्कृत व्याकरणाकडे ढुंकून हि पहावयाचें नाहीं, ही कोण तऱ्हा! लग्न लावावयाला जावयाचें आणि कुळगोत पहावयाचें नाहीं, हा सुधारकी बाष्कळ-पणा व्याकरणांत बिलकुल खपत नाहीं. कुळगोत न पहातां धेडगुजरीं लग्नें लावि-ल्यानें जशी अकर्माशी प्रजा निपजते, त्याप्रमाणें कुळगोत न पहातां शब्दांचें व प्रत्ययांचें वर्गीकरण केल्यानें, सर्वत्र अव्यवस्थितपणा व अशास्त्रता माजते.

(२५)

कतिचन = कितिजण

किंचन = काहीजण, कोणजण

एकचन = एकजण

इतरेचन = येरजण

सर्वेचन = सर्वजण, सारेजण, साऱ्याजणी

मराठी ग्रंथ संग्रह
नं. ........
ना. ........
ठाणे.

विश्वचन = विश्वजन
द्विचन = दोघेजण

हीं सर्वनामें चन हें अव्यय लागून झालीं आहेत.

---

## ( २० )

## अव्ययें

( १ )

स्वरादिनिपातम् अव्ययं ( १ – १ – ३७ ). अव्ययसर्वनाम्नां अकच् प्राक् टेः ( ५ – ३ – ७१ ). स्वरादि अव्ययांना अकच् प्रत्यय लागून व न लागून मराठींत येणेंप्रमाणें अव्ययें होतात. चादयः असत्वे ( १ – ४ – ५७ ). प्रादयः ( १ – ४ – ५८ ).

कम् = का

भाजी आणिली का आणि मग खाल्ली का. असा प्रयोग गोष्टी सांगताना गांवढे करतात. येथें का प्रश्नार्थक नाहीं. हा का प्रत्येक वाक्याच्या शेवटीं अपभ्रंशे निरर्थक योजतात.

---

नञ् = नकञ् = नग ( अकच्क )
तू नग जाऊं ( अशिष्ट )

---

हेतौ = हेतकौ = हेतूकी, हेतकी ( अकच्क )
मी तेथें गेलों; हेतूकी तो भेटावा.
येथें हेतूकी एवढें सबंद अव्यय आहे.

---

उच्चिरकम् = उशिरा ( अकच्क )
चिर या शब्दाचीं एकवचनीं रूपें संस्कृतांत अव्ययें आहेत.
उशिरानें, उशिरा, उशिरां.

---

अम्नस् ( अल्पार्थे ) + ल ( स्वार्थक ) = अम्मल = अंमळ
तो अंमळ थांबला = सः अम्नस् स्तब्धः
अंमळ म्हणजे किंचित्, थोडें

---

सूं
शु ( शैघ्र्ये ) = सू, सूं
तो सूं पळाला = सः शु पलायितः

---

होयबा, होबा
होवत = होबअ = होबा, होयबा

---

उगेंच, उगाच, उगीच
उकञ् + स्वित् = उगिच्च = उगीच, उगेच, उगाच
उकञ् अप्रयोजने निपातः
तो उगीच उभा राहिला म्हणजे निरर्थक उभा राहिला.

---

अरेहल्या
आर्यहलं ( बलात्कारे निपातः ) = अरेहल्या
पाणिनीच्या वेळेपासून हा निपात बैलांना हाकताना करीत आले आहेत !

---

ऐंसा
अंजसा ( शैघ्र्ये ) = अंञसा = ऐंसा
तो ऐंसा पळाला कीं ज्याचें नांव तें = सः अंजसा पलायितः
ऐंसा म्हणजे शीघ्र

---

सारखा
साक्षात् ( प्रत्यक्षे ) = साखा. र मध्यें येऊन सारखा
तो सारखा बघत होता म्हणजे प्रत्यक्ष बघत होता.
सारखा म्हणजे डोळे लावून

---

ठीक

स्थाने ( युक्ते ) = स्थानके ( अकच्क ) = ठीक

ठीक केलें = स्थाने कृतम्

---

झूट्

युत् ( कुत्सने निपातः ) = जुट् = झूट्

---

ओच्चा

आहोस्वित् = होच्चिअ = ओच्चिअ = ओच्चा

---

यंव

एवं ( उक्तपरामर्शे ) = यंव

अनवक्लृप्तौ

एवं कृतं = यंव केलें

---

मारूं

माङ् ऋधक् = मारूंहअ = मारूं

माङ् ( चादिगणांतलि )

ऋधक् सत्ये निपातः

मारूं म्हणजे खरें, बेश

चादिगणांतील माङ् वर ज्ञानेंद्र अशी टीका करतोः—उभयत्र पाठः चिन्त्य-प्रयोजनः । माङ् हें अव्यय स्वरादिगणांत हि आहे व चादिगणांत हि आहे. स्वरादिगणांतील माङ् शंकानिषेधार्थक आहे असें ज्ञानेंद्र सांगतो. परंतु चादि-गणांतील माङ् चा अर्थ आपल्यास ठाऊक नाहीं असें म्हणतो. मराठींत ह्या चादिगणांतील माङ् पासून मग हें मराठी अव्यय साधलें आहे. ह्या मग चा अर्थ नंतर, सर्वांनंतर.

मारूं म्हणजे सर्वांनंतर खरें, सर्वांत खरें, सर्वांत बेश.

---

मग

माङ् ( नंतर ) = मांग = मंग = मग

मंग असा उच्चार अशिष्ट अद्यापि करतात.

---

कां होई ना = कामं भवतु नाम

---

परतें

प्रताम् ( ग्लानौ निपातः ) = परतां, परतें

कुत्रें परतें मेलें = कुत्रें ग्लानि होऊन मेलें

परतें म्हणजे कुजून, दमून, ग्लान होऊन.

---

बरकां

वरकम् ( अकच्क ) = बरकां

वरकम् आगतः = आला बरकां

---

बरीक ( विशेषण )

सा वराकिका मृता = ती बरीक मेली

सः वराककः मृतः = तो बरीक मेला

वराकक म्हणजे क्षुद्र, दरिद्री, दुर्दैवी

बरीक हें येथें विशेषण आहे.

---

बरीक ( अव्यय )

ये बरीक, सांगतो तुला मग = एहि वरकम्, संख्यामि ते माङ्

---

द्या !

विडा खातो द्या ! = वीटिकां खादामि द्य

द्य प्रातिलोम्ये

---

जा !

येतो जा ! = यामि द्य अथवा द्यकम्

उलट टाकून व धिक्कारून बोलताना हें द्य = जा! अव्यय संस्कृतांत व मराठींत योजतात.

---

घ्या

येतो आहे घ्या = यामि द्य

या द्य निपातापासून च हा मराठी घ्या निपात निघाला आहे.

---

शान, छान, श्यान्

सः प्रशान् कर्म करोति = तो फार शान काम करतो.

पानें आणिलीस फार शान् झालें = पर्णानि आहृतानि, प्रशान् संवृत्तं.

. पानें आणून श्यान् = पर्णानि आहृत्य प्रशान्

प्रशान् सामर्थ्ये. प्र = फार.

शान् कुस्ती करतो = प्रशान् युद्धं करोति

काम करून शान् जातो = कर्म कृत्वा प्रशान् गच्छति

---

वरताण्

तो खातो, वरताण् रडतो = सः खादति, प्रतान् रोदिति

---

अहा

अहक ( पूजायां ) = अहा

अहा, काय गाय आहे = अहक, किंगौः एषा

---

मात्क्यान्

मध्यके = मत्के = मात्के = मात्क्यान्

मात्क्यान् म्हणजे मध्यें च

---

बाकीं

माकीम् = वांकीम् = बाकीं

माकीम् वर्जने

तो लंगडा आहे; बाकी सर्व ठीक आहे = सः लंगः अस्ति, मांकीम् स॰ सुष्ठु विद्यते

---

नाही ( निपात )

नहि = नाही

नाहि जात = नहि गच्छति

---

७

न

ते न जात = ते न गच्छंति

---

चट

चटु ( प्रिये निपातः ) = चट्
चटु कर्म करोति = चट काम करतो
चट म्हणजे आनंदानें

---

हट्

अट् ( संबोधने निपातः ) = हट्

---

आता !

तो मेला, आता ! = आदह, सः मृतः
आदह = ( कुत्सने ) = आधा = आता

---

बस

पशु ( सम्यगर्थे ) = वसु = बसु = बस
बस म्हणजे उत्तम, पुरे

---

म्हणून

माङ् अन्वक् = माङ् अनू = माङून = मानून = म्हणून
माङ् म्हणजे मग
अन्वक् म्हणजे नंतर
माङ् अन्वक् = म्हणून = मग नंतर
तो दारू प्याला, म्हणून मेला = मग नंतर मेला.

---

रे ( अनादरें )
रै ( अनादरे ) = रे
निघ, जानो रे ( अनादर )

---

४०८३

गा, अगा

अंग = अगा = गा

---

आहे, हय, है

अस्ति = आहे = है = हय

आहे किंवा हय, कसा उड्या मारतो = अस्ति, कथं उड्डयते

अस्तकि ( अकच्क ) = आहेकी

---

तिरकस्

तिरस् – तिरकस् ( अकच्क ) = तिरकस्

सः तिरस् पश्यति = तो तिरकस् पहातो.

---

जो ( शीघ्रार्थे )

ज्योक् = जो

बाण जो निघाला = बाणः ज्योक् निर्गतः

बाण जो का निघाला = बाणः ज्यकोक् निर्गतः

---

फारच

प्रायस् ( बाहुल्ये ) प्रायस् = फारच् = फारच.

पाणी फारच आहे = पानीयं प्रायस् वर्तते

---

अन्यत् ( उभयान्वयी )

( अकच्क ) अन्यकत् = आणिक

---

म्हणून

तो येईल म्हणून मी वाट पहात आहे = सः आयास्यति इति मत्वा अहं तं प्रतिपालयामि

मत्वा = मनून = म्हणून

दूध म्हणून पाणी प्यालों = दुग्धं मत्वा पानीयं पीतवान्

---

म्हणून, म्हणायचा

ज्ञानेश्वर म्हणून किंवा म्हणायचा कवि झाला = ज्ञानेश्वरं मन्यः किंवा भण्यः कविः अभूत्.

मन्य म्हणून किंवा म्हणायचा. येथें म्हणून हें विशेषण आहे.

त्याचें लिहून, म्हणून, झालें = तस्य लेख्यं, भण्यं समाप्तं

भण्यं = म्हणुत्रि = म्हणुनि = म्हणून

भण्य = म्हणायच

---

म्हणणार, म्हणविणार

रामा म्हणणार कोणी शिपाई = रामः भण्यमानः कोऽपि पदातिः

भण्यमानः = म्हणाना = म्हणणार

हा प्रयोग कोल्हापूरप्रांतीं होतो.

---

म्हणून

त्याला म्हणून, कवडी देणार नाहीं = तस्मै माङ् नूनं कपर्दिकां अपि न दास्यामि

माङ् नूनं = माणून = म्हणून

---

म्हणून

असें म्हणून, तो गेला = इति भणित्वा सः गतः

---

म्हणे

तो म्हणे आला = सः मन्ये आगतः

मन्ये ( निपात )

---

म्हणजे

सुवर्ण म्हणजे सोनें = सुवर्णं भण्यते सोनें इति

---

म्हणजे

पाऊस आला म्हणजे पूर येईल = देवो वर्षति माङ् चेत् पूरः यास्यति

माङ् चेत् = माणजेअ = म्हाणजे = म्हणजे

---

आ.गो.

म्हण

तो आला म्हण = सः आगतः मन्यस्व, मनुष्व

---

म्हणा

कसें तरी दूध मिळालें म्हणा = कीदृशं अपि दुग्धं मिलितं मनाक्

मनाक् ( अल्पे ) = म्हणा

---

ऐक

जेवतो, ऐक! = जेमामि अयके

अये – अयके ( अकच्क ) = ऐके = ऐक

येथें कानांनीं ऐकण्याचा कांहीं एक संबंध नाहीं.

---

हैक

है – हकै ( अकच्क ) = हैक

गुरांना दटावण्याचा स्वर

---

नि, ना

अंध नी कृष्णाला बघणार = अंधो नाम कृष्णं द्रक्ष्यति

तो नां येतो आहे = स नाम यन् अस्ति

नाम = नावं = नां, नी

---

[illegible] आज्जर! जर!

तिचा प्राण जाईल आज्जर अन्न मिळेल=प्राणः तस्याः यास्यति, आश्चर्य अन्नं मिलिष्यते

आश्चर्य = आच्चर = आज्जर = जर

---

होतर

भवति भवान् ग्रामं यास्यति = होतर आपण गावास जाल

भवति = होति = होतर

र निरर्थक

---

बघू

यांत भकोः = जा बघू

भोः भकोः ( अकच्क ) = बघो = बघूं

---

फारस ( सा–सी–सें )

प्रसह्य = फारसय = फारस

प्रसह्य म्हणजे जोरानें, बलात्कारानें, पुष्कळ.

---

फार काय

प्रकामम् = फार कावं = फार काय

प्रकामम् म्हणजे आनंदानें

फार काय, मी देखील येईन म्हणजे आनंदाने मी येईन.

---

फार करून

प्रायः कृत्य = फार करून Mostly

---

फार आडवें

प्राध्वम् = फार आडवं = फार आडवें

तुम्ही फारआडवें बोलतां = यूयं प्राध्वं ब्रूथ

---

जरकी–का

यर्न्हिकि ( अकच्क ) = जरकी, जरका

जरका तो आला = यर्न्हिकि स आगच्छेत्

---

तरकी–कां

तर्न्हिकि ( अकच्क ) = तरकी–का

---

निकें, नक्की

निकामम् = निकावं = निकाअं = निकें = नक्की

निकामम् म्हणजे इछेनुरूप.

---

नको

नो–नको ( अकच्क ) = नको ( अव्यय )

---

नाहीकी

नहि–नहकि ( अकच्क ) = नाहीकी

---

झकत्

झक्–झकत् ( अकच्क ) = झकत् ( तावडतोब )

---

कधीका

कदा–कद्का ( अकच्क ) = कधीका

---

कुठिका

कुत्र – कुत्रक ( अकच्क ) = कुठका

---

एकदाका

एकदा–एकद्का ( अकच्क ) = एकदाका

---

इतर आणीक बरींच अव्ययें मीं इतरत्र व्युत्पादिलेलीं पहावीं.

---

## ( २१ )

## प्रादि

### प्र

प्र या उपसर्गापासून मराठींत फार व परत हे उपसर्ग झाले आहेत.

फार ताणतो = प्रतनोति

फार गातो = प्रगायाति

फार चालतो = प्रचरति



ग्रंथ ... नं. ...

स्फिरं व स्फारं पासून पुष्कळ या अर्थी फार अव्यय होतें तें ह्या फार उपसर्गाहून निराळें.

प्रोत्तम = फार उत्तम
प्रकल्याण = फार कल्याण
प्रशाखः वृक्षः = फार शाखांचा वृक्ष
प्रश्लथ = फार सैल

येथें फार हा उपसर्ग आहे, क्रियाविशेषण नाहीं.

प्रतियाति = परत जातो
प्रतिउत्तरति = परत उत्तर करतो
प्रतिब्रवीति = परत बोलतो
इ० इ० इ०

---

## परा

परा या निपातापासून मराठींत ला हें कर्मप्रवचनीय झालें आहे.

शत्रुं पराजयते = शत्रू लाजिंकतो
पानीयं गोविंदाय परादुदाति = पाणी गोविंदा लादेतो
गृहं परावर्तते = घरा लायेतो
तं पराभवति = त्या लाभोवतो
हरिणं परापातयति = हरणा लापाडतो
गां पराहंति = गाई लाहाणतो

हा ला निपात आहे, विभक्तिप्रत्यय नाहीं. विभक्तिप्रत्यय समजून मराठी वैयाकरण परिस्फोट करावयाला जातात व विपत्ति पावतात.

---

## अप

अप चें महाराष्ट्रींत अव, ओ होऊन मराठींत ओकारादि क्रियापदें साधतात. स्वतंत्रपणें प्र किंवा परा यांपासून निघालेल्या फार किंवा ला उपसर्गाप्रमाणें ह्याचा प्रयोग मराठींत होत नाहीं.

---

## सम्

सम् निपातापासून मराठींत स कर्मप्रवचनीय निघाला आहे.

ग्रामं संयाति = गावां सजातो
यजमानं संयाचते = यजमाना सयाचतो

तं संभ्रवीति = त्या सबोलतो
देवं संमानयति = देवा समानतो
विष्णुं संपूजयति = विष्णू सपूजतो

येथें स हें कर्मप्रवचनीय आहे; विभक्तिप्रत्यय नाहीं. हे स, ला, ते उपसर्ग मराठींत कर्मप्रवचनीय असल्यामुळें, क्रियापदापासून तुटक योजिले जातात व नामांच्या पुढें येतात.

---

## अनु

अनु या निपातापासून मराठींत न, नू नि व ने हे कर्मप्रवचनीय आले आहेत.

दिवसं अनु दिवसं = दिवस नू दिवस, दिवसंदिवस
गृहं अनु गृहं = घर नू घर
मातरं अनु दुहिता = माय नू लेक
शास्त्रं अनु चरति = शास्त्रा न चालतो
जपं अनु वृष्टिः = जपा न वृष्टि

शास्त्रा न चालतो, जपा न वृष्टि होते, ह्या वाक्यांत न हें कर्मप्रवचनिय आहे व शास्त्रा जपा ह्या द्वितीया आहेत. तृतीयेचा नें प्रत्यय निराळा.

दिवसान् अनु दिवसान् = दिवसा नू दिवसा
वर्षं अनु वर्षं = वर्षा नू वर्ष
मनुष्यं अनु मनुष्यं = माणूस नि माणूस
गृहं अनु गृहं = घर नि घर
द्वारं अनु द्वारं = दार नि दार, दार नू दार, दारंदार,
गाय कुंपणानें चरते = गौः वृतिं अनु चरति
रस्ता नदीने जातो = मार्गः नदीं अनु वर्तते

---

## अव

अव पासून महाराष्ट्रीद्वारा मराठींत उ किंवा ओ हा उपसर्ग आला आहे व तो क्रियापदांना सदा जुडून असतो. संस्कृतात् पंचमीच्या पुढें हा निपात कर्मप्रवचनिय असतो.

ग्रामात् अव ग्रामं अटति = गावोगाव हिंडतो
द्वारात् अव द्वारं अभ्यटति = दारोदार भटकतो

---

## संनिस्

ह्या जोड निपातापासून मराठींत सनी हें कर्मप्रवचनीय होतें.

तं सं निर्ब्रवीति = त्या स नी बोलतो

तं सं निर्मारयति = त्या स नी मारतो

---

## प्रति

प्रति ह्या निपातापासून मराठींत ते व वरि–वर हीं कर्मप्रवचनीयें निघतात

वर्षं प्रति = वर्षा ते

धर्मं प्रति = धर्मा ते

गंगां प्रति = गंगे ते किंवा गंगे वरि–र

रणांगणं प्रति = रणांगणा ते किंवा रणांगणा वरि–र

धान्यात् प्रति = धान्या वरि

धान्यात् प्रति दुग्धं गृहीतं = धान्या वर दूध घेतलें.

तिलेभ्यः प्रति यछति माषान् = तिळावर उडीद देतो.

मातरं प्रति साधुः = मातेतें चांगला

---

## पारि

परि या निपातापासून मराठींत वरि – र परी भर व भारी हे निपात उद्भवतात

गृहं परि = घर भर, घराभर

वृक्षं परि= वृक्षा वरि–र

शत्रुं परि= शत्रू वरि–र

यद् मां परि स्यात् = जें मज वर असेल ( माझ्या वाट्यास )

वर्षात् परि = वर्षा वर

धर्मणः परि = धर्मा परी

पात्रं परि = पात्रभर

पर्यश्रु = भारी रडवा

परि = वरि = बरि = भारी

परिदुर्बलः = भारी दुर्बल

द्रव्यं द्रव्यं परि यातं= द्रव्या परी द्रव्य गेलें

आलस्यात् परि दारिद्र्यं = आळसा वरि दरिद्र आलें

---

## उप

उपं पासून मराठींत प हें कर्मप्रवचनीय झालें आहे. ह्यांचा प्रचार अशिष्टांत फार.

गृहं उप = घरा प

द्वारं उप = दारा प

नदीं उप = नदी प

---

## ( २२ )

## उपरि

| | |
|---|---|
| वृक्षं उपरि | = वृक्षा वरि-र |
| सर्वेषां उपरि | = सर्वा वरि-र |
| मम उपरि क्रुद्धः | = मज वर रागावला |
| मुहूर्तात् उपरि | = मुहूर्ता वर काळ लोटला |
| उपर्युपरि | = वरिवरि, वरवर |

---

## अंतिके

| | |
|---|---|
| मासस्य अंतिके | = महिन्याचे आंत |
| मासान्ते | = महिन्यांत |

---

## तात्

| | |
|---|---|
| उपरिष्टात् | = वरता |
| पुरस्तात् | = पुढता |
| अधरस्तात् | = आरता |
| अवरस्तात् | = वरता |
| उत्तरस्तात् | = उतरता, वरता |
| दक्षिणात्तात् | = दखणता = खलता = खालता (ण = ळ) |

खालता व वरता हे निपात गांवढे फार योजितात. वरता म्हणजे उत्तरेस व खालता म्हणजे दक्षिणेकडे. अवरस्तात् पासून जो वरता शब्द निघाला त्याचा अर्थ खालीं. उपरिष्टात् याच्यापासून जो वरता शब्द निघाला त्याचा अर्थ वर. असे हे दोन अर्थ वरता शब्दाचे आहेत व ते तसे गांवढे योजतात. गांवढ्यांच्या बोलण्यांतील वरता शब्दाचा अर्थ संदर्भावरून व हातवाऱ्यावरून समजावयाचा असतो.

त्या घराखालीं तें घर आहे म्हणजे त्या घराच्या दक्षिणेस तें घर आहे.

त्या घरावर तें घर आहे म्हणजे त्या घराच्या उत्तरेस तें घर आहे.

उत्तर दिशा म्हणजे वरची दिशा व दक्षिण दिशा म्हणजे खालची दिशा. ह्यावरून वर व खालीं ह्या शब्दांचे असे अर्थ आहेत.

( तल शब्द दिग्वाचक समजून ) खतलात्तात् = खअलता = खालता

ख म्हणजे विवर, खोलगा. त्याचा तल तो खतल. पंचम्याः तातिः (५-३-२७)

खालता म्हणजे खोलग्याच्या तळचें. खालीं म्हणजे तळांतील.

घरा खालीं भुयार आहे म्हणजे घराच्या तळांत भुयार आहे.

येणेंप्रमाणें खालीं या शब्दाचे मराठींत दोन अर्थ आहेतः—( १ ) दक्षिणेस, ( २ ) तळास.

दक्षिणाहि = दखणाइ = खणाइ = खलाइ = खाली
उत्तराहि = वरी
दक्षिणा = खाला
उत्तरा = वरा

घरा खाला किंवा खाली; घरा वरा किंवा वरी; असे प्रयोग ग्रामजन करतात.

---

## परतें

त्या परते आणीक कांहीं एक सांगावयाचें नाहीं = तस्मात् पृथक् अन्यत् किमपि इषत् वक्तव्यं नास्ति.

रामात् पृथक् = रामा परतें
पृथक् = परथअ = परतें
बायको परतें अन्य दैवत नाहीं = स्त्रियः पृथक् अन्यं दैवतं नास्ति

---

## संस्कृत तृतीया व पंचमी

स्तोकेन स्तोकात् मुक्तः = थोडक्यानें किंवा थोडक्यात् सुटला

इयतिकेन इयतिकाद् वा न समाप्तं = इतक्यानें किंवा इतक्यात् संपलें नाहीं. तुझ्या म्हटल्यानें किंवा म्हटल्यात् मरतो असें नाहीं = तव भणितेन वा भणितात् म्रियते इति न

कतिपयेन कतिपयाद् वा प्राप्तः = केवढ्यानें किंवा केवढ्यात् मिळाला

तात्पर्य, मराठींत कित्येक स्थलीं आत् प्रत्यय लागून पंचमी होते.

आसकलात् ब्रह्म = सगळ्यात् ब्रह्म
धुमात् किं ज्ञायते = धुरात् काय समजतें

धूमात् अग्निः ज्ञायते = धुरान् अग्नी समजतो

तत्र गतात् किं भविष्यति = तेथें गेल्यात् काय मौज आहे

इ. इ. इ.

## ( २३ )

## तरतम-प्रत्ययाभाव

संस्कृतांत कधींकधीं तरतमदर्शक प्रत्ययावांचून तरतमभाव दर्शविला जातो. ती धर्ती मराठीनें सररहा उचलली आहे.

अयं अस्मात् बलेन हीनः = हा याहून बलानें हीन आहे

देवदत्तो यज्ञदत्तात् पटुः = देवदत्त यज्ञदत्ताहून चलाख

इ. इ. इ.

तात्पर्य, इतर सर्व प्रयोगाप्रमाणें, ही धर्ती हि मराठीनें संस्कृतांतून च उचलली आहे. वांशिक खोडी म्हणतात त्या ह्या च.

## ( २४ )

## कित्येक संस्कृत प्रयोग

( १ ) गतस्य स्मरितं = गेल्याचें स्मरलें

( २ ) प्रभवति कन्यकाजनस्य = मुलींचें पहात आहे

तो आपल्या मुलींचें पहात आहे; तुम्ही आपल्या मुलाचें पहा.

( ३ ) तेन धनस्य नाथ्यते = द्रव्याचें नडतें

( ४ ) सः धनस्य नाथते = तो पैशाचें नाडतो

( ५ ) वृषलस्य क्राथयति = वृषलाचें काढतो

( ६ ) तस्य क्राथयामि = त्याचें काढतों

थांब, मी त्याचें काढतों म्हणजे मी त्याला मारतो. क्राथय् म्हणजे मारणें.

( ७ ) गोपी कृष्णाय श्लाघते = गोपी कृष्णाला लागते, लागू होते.

श्लाघ् म्हणजे इच्छा करणें.

( ८ ) अक्षैः अक्षान् वा दीव्यति = फासे किंवा फाशांनीं खेळतो

( ९ ) फलेभ्यः याति = फलांना जातो

( १० ) तव अध्येति = तुझें शिकतो

( ११ ) तस्य अतिश्वी निंदाकृता = त्याची ऐशी निंदा केली.

( अतिश्वी म्हणजे कुत्र्याहून हि वाईट )

संस्कृतांची धर्ती जेथें मराठीनें उचलली आहे असे शेकडो प्रयोग मराठींत आहेत.

## ( २५ )

### द्विरुक्त

पाऊसबिऊस = प्रावृष्विप्रुष्
आपटबिपट = आपत्विपत्
वेचणेंबिचणें = वेचनंविवेचनं
वाद्बीद् = वादविवाद
आळसबिळस = आलासविलस
लांबबिंब् = लंबविलंब
ह्णतोबिणतो = हंतिविहंति
करतोबेरतो = करोतिविकुरुते
हसतोबिसतो = हसतिविहसति
विणणेबिणणे = वयतिविवयति
रूपबेरूप = रूपंविरूपं
सोयराधायरा = सोदराः धात्रेयाः
दगडबिगडं = दृषद्विदृषद्
कडूबिडू = कटुविकटु
आंबटबिंबट = आम्लव्याम्ल

बि हें संस्कृत वि पासून निघालेलें आहे. वि आधिक्य किंवा वियोग दाखवितो.

## ( २६ )

### एकशेष व कत्यक्षरशेष

देवदत्तः = दत्तः ( एकशेष ) किंवा देवः ( एकशेष )
एकनाथ = एका किंवा नाथ, एक्या किंवा नाथ्या ( एकशेष )
विनायक = विना, विनू, विन्या ( एकशेष )
सरस्वती = सरू ( एकशेष )
लक्ष्मण = लक्ष्या किंवा मण्या
दीनानाथ = दिन्या किंवा नाथ्या
विठ्ठल = विठ्या किंवा ठोल्या, ठल्या
मनकर्णिका = मनु, मनकी, मनी
सत्यभामाबाई = सत्यबाई किंवा भामाबाई
वाराणसी = वारू, वारणा

वाणारसी = वाना
बनारसी = बनू
सकुंतला = सकू
यमुना = यमू...
कावेरी = काऊ
चंद्रहासा = चंद्रा किंवा हाशी
वक्रतुंडा = बकू
गोपालकृष्ण = गोप्या किंवा कृष्ण्या
गोपीनाथ = गोप्या किंवा नाथ्या
रामदास = राम्या किंवा दाश्या
गणपति = गणू, पत्या, गणप्या

माकड आणि माकडी = माकडें
लांडगा आणि लांडगा = लांडगे (एकशेष)
राम आणि राम = राम (एकशेष)
*कोंबडा आणि कोंबडी = कोंबड्या (एकशेष)
*चिमणे आणि चिमण्या = चिमण्या (एकशेष)
शूद्र आणि शूद्री = शूद्र
वाघ आणि वाघीण= वाघ (वाघाला चार पिलें होतात)
*मेंढे आणि मेंढ्या = मेंढ्या
*मेंढा आणि मेंढी = मेंढ्या

*येथें एकशेष स्त्रीलिंगी होतो. हे समास दामल्यांच्या लक्ष्यांत आलेले नाहींत.

---

## एकशेषाचा एक प्रकार

(१) पानिपतांत एक लाख बांगडी फुटली
(२) यात्रेला दीड कोट माणूस लोटलें
(३) पारध्यांनीं आज शंभर वाघ मारिला
(४) देवळांत दोनशे स्त्री जेविली

या वाक्यांत बांगडी, माणूस, वाघ व स्त्री हे शब्द समास आहेत. कित्येक वैयाकरण अशा स्थलीं या शब्दांना collective nouns म्हणून इंग्रजी धर्तीवर म्हणतात. परंतु ती इंग्रजी धर्ती गचाळ आहे. अशा ठिकाणीं collective noun आहे अशी समजूत करून चालल्यास, मराठींतील सर्व च नामें collective होऊं लागतील. कोणतें हि कार्य सार्वत्रिक दृश्यमान् झालें म्हणजे

त्याला सामान्य वृत्ति म्हणण्याचा परिपाठ आहे. ह्या नियमान्वयें मराठींत कोणत्या हि नामाला एकशेष समासवृत्ति होते व त्या वेळीं तें नाम एकवचनी चालतें.

बांगडी आणि बांगडी आणि बांगडी = बांगडी (एकवचन)
माणूस आणि माणूस आणि माणूस = माणूस (एकवचन)
वाघ आणि वाघ आणि वाघ = वाघ (एकवचन)
स्त्री आणि स्त्री आणि स्त्री = स्त्री (एकवचन)

ह्या एकवचनी रूपांत बहुवचनी अर्थ असतो. त्यांच्या बद्दला बांगड्या, माणसें, वाघ व स्त्रिया हीं अनेकवचनीं एकशेष रूपें चालतात. संस्कृतांत फक्त द्विवचनीं किंवा बहुवचनीं एकशेषवृत्ति दृष्टीस पडते. मराठींत एकवचनीं व बहुवचनीं अशा दोन्हीं वचनीं ही वृत्ति दृश्यमान होते.

---

## ( २७ )

## क्रियासमभिहारे लोट्० ( ३–४–२५ )

याहि याहि इति याति = जा जा जातो
पठ पठ इति पठति = पढ पढ पढतो
सक्तून् पिब, धानाः खाद इति अभ्यवहरति= सातू पी, दाणे खा, असें भरतो
तो एकसारखा भरतोहे = स सततं अभ्यवहरति
अभ्यवहरति = भ्यअअरइ = भ्यरे = भरे, भरतो
एथें भरणें हें अकर्मक आहे. भृपासून भरणें सकर्मक.
खाद खाद इति खादथ = खा खा खा
मी खाखा खातो
आम्ही खाखा खातों
तूं खाखा खातोस
ते किंवा त्या खाखा खातात, खातील.
इ. इ. इ.

क्रियासमभिहार असतां लोट् चें द्वितीयपुरुष एकवचन संस्कृतांतल्याप्रमाणें मराठींत होतें.

---

## ( २८ )

## अतिशायन

| | | तर | तम |
|---|---|---|---|
| ( दृढ ) | धड | धडसच | धड्ड ( द्रढिष्ठ ) च |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | ( परिवृढ ) | भारीवूड | भारीवुड्डसच | भारीवुड्ड ( ड्डू, ड्डी ड्डें ) |
| | ( पृथु ) | पुरत | पुरतसच | पुरतच |
| | ( भृश ) | बस | बसच (बससच) | बसच |
| | ( मृदु ) | मऊ | मउसच | मवट |
| | ( कृश ) | कस | कससच | कसच |
| | ( अंतिक ) | आंत | आतसच<br>नीटसच | नीटच |
| | ( अल्प ) | हळ | हळसच | हळच |
| ( *कंन ) | ( अल्प ) | कमी (कनीयस्) | कमीसच | कमीच |
| | ( उरु ) | बर | बरसच | बरच |
| | ( क्षुद्र ) | खोट<br>खुज | खोटसच<br>खुजसच | खोटच<br>खुजच |
| | ( गुरु ) | गोल | गोलसच | गोलच |
| | ( तृप्र ) | तिरप | तिरपसच | तिरपच, तिरपट |
| | ( दीर्घ ) | दिर्घ | दिर्घसच | दिर्घच, दिर्घट |
| | ( दूर ) | दूर | दूरसच | दूरच |
| | ( प्रशस्य ) | फारसच | सरस (श्रेयस्) | सरच, सरस |
| | ( बहु ) | बहुत | बहुतच | बहुत |
| | ( बाढ ) | साध | साधसच | साधच |
| | ( वृद्ध ) | वुड्ढ | वुड्ढसच | वुड्ढच |
| | ( वृन्दारक ) | रुंद | रुंदसच | रुंदच, रुंदट |
| | ( स्थिर ) | थीर | थीरसच | थीरच |
| | ( स्थूल ) | ठोल्य | ठोल्यसच | ठोल्यच, ठोलट |
| | ( स्फिर ) | फार | फारसच | फारच |
| | ( ऱ्हस्व ) | लहानस<br>ऱ्हस्व | लहानसच<br>लहस | लहानसच<br>लहानस |
| | ( लघु ) | हळू | हळूसच | हळूच |
| | ( महत् ) | मोठ | मोठसच | मोठच |
| | ( अति ) | अती | अतीसच | अतीच |
| | | गोड | गोडसच | गोडच |
| | | सुंदर | सुंदरसच | सुंदरच, सुंदरट |
| | | सरळ | सरळसच | सरळच |
| | ( कीदृश ) | कस | कससच | कसच |

संस्कृत ईयस् पासून सच प्रत्यय मराठींत आला आहे. यस = जस = सच ( ज = स; व स = च ). इष्ठ पासून ट किंवा चें आला आहे. ष्ठ = ट्ट = ट. ष्ठ = स्ट=स्त = च्च = च. येणेंप्रमाणें मराठींत अतिशायनदर्शक सच, व ट, च प्रत्यय आहेत. त्यांची ओळख पूर्ववैयाकरणांना पटलेली नाहीं. पैकीं, तरभावदर्शक धडस, घरस, सुंदरस, हीं चविरहित रूपें मराठींत फार योजतात.

( १ )

हें वस्त्र धड आहे ( सार्धे )
ह्या दोहोंतून तुला धडसँच वस्त्र देतों ( तरभावदर्शक )
ह्या अनेकांतून तुला धडच वस्त्र देतों ( तमभावदर्शक )

( २ )

बरेंच दूध = भृशं पयः
बरसेंच दूध = भ्रशीयः पयः
बरेंच दूध = भ्रशिष्ठं पयः

( ३ )

सुंदर स्त्री = सुंदरी स्त्री
सुंदरसीच स्त्री = सुंदरीयसी स्त्री
सुंदरच स्त्री = सुंदरिष्ठा स्त्री

( ४ )

तो हळू बोलतो = स लघु वक्ति
तो हळूसेंच बोलतो = स लघीयः वक्ति
तो हळूच बोलतो = स लघिष्ठं वक्ति

५

रुंद कापड = वृंदारकं कार्पासकं
रुंदसेंच कापड = वृंदीयः कार्पासकं
रुंदच कापड = वृंदिष्ठं कार्पासकं

६

प्रियपति = प्रियः पतिः
प्रियसाच पति = प्रेयान् पतिः
प्रियच पति = प्रेष्ठः पतिः
अशोकाच्या शिलालेखांत प्रियसा रूप आलें आहे.

७

| | |
|---|---|
| फारसच वस्त्र | = प्रशस्यं वस्त्रं |
| त्या दोहोंतून सरस वस्त्र | = श्रेयः वस्त्रं |
| सरच, सरस वस्त्र | = श्रेष्ठं वस्त्रं |

८

| | |
|---|---|
| खोटें माणूस | = क्षुद्रः मनुष्यः |
| खोटेंसेंच माणूस | = क्षोदीयान् मनुष्यः |
| खोटेंच माणूस | = क्षोदिष्ठः मनुष्यः |

९

| | |
|---|---|
| साधें काम | = साधु वा बाढं कर्म |
| साधेंसेंच काम | = साधीयः कर्म |
| साधेंच काम | = साधिष्ठं कर्म |

१०

| | |
|---|---|
| पुरतें वस्त्र | = पृथु वस्त्रं |
| पुरतेंसेंच वस्त्र | = प्रथीयः वस्त्रं |
| पुरतेंच वस्त्र | = प्रथिष्ठं वस्त्रं |

११

| | |
|---|---|
| मऊ गादी | = मृदुः गद्दिका |
| मऊशीच गादी | = म्रदीयसी गद्दिका |
| मऊच गादी | = म्रदिष्ठा मृदुः गद्दिका |

१२

| | |
|---|---|
| फारच फार | = स्फेष्ठं स्फिरं |
| मोठेंच मोठें | = महिष्ठं महत् |
| लहानच लहान | = ह्रसिष्ठं ह्रस्वं |
| हलूच हलू | = लघिष्ठं लघु |
| कडूच कडू | = कटिष्ठं कटु |
| लांबच लांब | = लंबिष्ठं लंबं |

अजादी गुणवचनादेव ( ५-३-५८ ). संस्कृतांत ईयस् व इष्ठ प्रत्यय गुणवचनाला च तेवढे लागतात. मराठींत कित्येक अव्ययांना हि लागतात.

१३

ती काल आली
ती कालशीच आली ( त्याहून काल )
ती कालच आली ( फार काल )

१४

तो पहाटे आला
तो पहाटेसच आला ( त्याहून पहाटे )
तो पहाटेच आला ( अति पहाटे )

१५

तो रात्रीं पढतो
तो रात्रींसच पढतो ( मागच्याहून रात्रीं )
तो रात्रींच पढतो ( अति रात्रीं )

१६

तो प्रहरदिवसा निजतो
तो प्रहरदिवसासच निजतो
तो प्रहरदिवसाच निजतो

१७

तो गतवर्षा वारला
तो गतवर्षासच वारला
तो गतवर्षासच वारला

१८

तो मघा येऊन गेला
तो मघासच येऊन गेला ( मागच्याहून आधीं )
तो मघाच येऊन गेला ( सर्वांत आधीं )

१९

ती लवकर आली
ती लवकरच आली ( मागच्याहून लवकर )
ती लवकरसच आली ( सर्वांत लवकर )

तात्पर्य मराठींत अतिशायन व द्विवचनविभज्योपपदें आहेत व त्यांचे प्रत्यय ट, च आणि सच हे आहेत. च म्हटला कीं त्याला षष्टीचा प्रत्यय मराठी वैयाकरणपाशांनीं ठरविला च. परंतु, प्रकृत स्थलीं तसा कांहीं एक प्रकार नाहीं,

सभेस बरे लोक आले होते
सभेस बरेसचे किंवा बरेचसे लोक आले होते ( Comparatively more )
सभेस बरेच लोक आले होते ( Supremely more )

अतिशायनत्वांत तमत्व दाखविणारीं कित्येक रूपें मराठींत स्वतंत्र विशेषणें बनलीं आहेत व ती मूळचीं संस्कृतांतलीं तमभावदर्शक होती याचा विसर पडलेला आहे. अशा तमत्वदर्शक विशेषणांपासून पुनः तरतमभावदर्शक रूपें मराठींत होतात.

| | | | |
|---|---|---|---|
| ( आम्लिष्ठ ) | आंबट | आंबटसच | आंबटच |
| ( तिक्तिष्ठ ) | तिखट | तिखटसच | तिखटच |
| ( क्षारिष्ठ ) | खारट | खारटसच | खारटच |
| ( श्रेष्ठ ) | श्रेष्ठ | श्रेष्ठसच | श्रेष्ठच |
| ( कटिष्ठ ) | कडवट | कडवटसच | कडवटच |
| ( मधिष्ठ ) | मधट | मधटसच | मधटच |
| ( स्वादिष्ठ ) | स्वादट | स्वादटसच | स्वादटच |
| ( व्यथिष्ठ ) | वाइट | वाइटसच | वाइटच |
| ( भंगिष्ठ ) | भंगट | भंगटसच | भंगटच |
| ( रागिष्ठ ) | रागीट | रागीटसच | रागीटच |
| ( रूक्षिष्ठ ) | राकट | राकटसच | राकटच |
| ( वक्रिष्ठ ) | वाकड | वाकडसच | वाकडच |
| ( नेदिष्ठ ) | नीट | नीटसच | नीटच |
| ( कुंदिष्ठ ) | कोंदट | कोंदटसच | कोंदटच |
| ( पिष्टिष्ठ ) | पिठट | पिठटसच | पिठटच |
| ( गोलिष्ठ ) | गोलट | गोलटसच | गोलटच |
| ( गुंडिष्ठ ) | गोंडट | गोंडटसच, गोंडसच, | गोंडटच |
| ( क्षविष्ठ ) | खवट | खवटसच, खवचट, | खवटच |
| ( वातिष्ठ ) | वातट–ड | वातडसच | वातडच |
| ( मृतिष्ठ ) | मातड–ट | मातटसच | मातटच |
| ( लाक्षिष्ठ ) | लाकट | लाकटसच | लाकटच |

## ( २१ )

### तरतम

खायला गोडतर हवें, कडूतर नको = खादितुं स्वादुतरं भाव्यं, कटुतरं नकाम्यम्

त्याला चांगलें रुचतें = तस्मै चंगं रोचते

दोन फळांतून चांगलेंतर मिळालें = चंगतरं मिलितं

साखर चांगलीतर पाहिजे = शर्करा चंगतरा प्रार्थ्यते

भात पांढरातर आवडतो = भक्तः शुक्लतरः रोचते

येथें तर हा प्रत्यय अतिशायन दाखवितो. हा तर प्रत्यय आहे, उभयान्वयी अव्यय नाहीं.

गोडतो पदार्थ हवा = स्वादुतमः पदार्थः भाव्यः

गोडती भाजी खातो= स्वादुतमा भाजी खाद्यते

गोडतें वरण बरें लागतें = स्वादुतमं वरान्नं वरं लक्ष्यते

तम = तवं = तं ( तों, तीं, तें )

संस्कृतांतल्याप्रमाणें मराठींत हि हे प्रत्यय नामांना लागतात.

घोडा दहा कोस धांवतो = घोटकः दश कोशान् धावति

घोडातर वीस कोस धांवतो = घोटकतरः विंशति कोशान् धावति

घोडातों वीस कोस धांवतो = घोटकतमः त्रिंशत् कोशान् धावति

तो अंधळातर नाहीं = सः अंधतरः नास्ति

तो अंधळातों नाहीं = सः अंधतमः नास्ति

संस्कृतांतल्याप्रमाणें मराठींत हि हे तर व तम प्रत्यय क्रियापदांना लागतात.

तो अन्न शिजवतोतर खरा = सः अन्नं पचतितरां इति सत्यम्

तो गातो = सः गायति

तो गातोतर = सः गायतितरां

तो गातोतो = सः गायतितमां

तो गातोतो त्याला आण = संगायतितमां तं आनय

तो गातोतर त्याला आण = सः गायतितरां तं आनय

मी काम करतोतर = अहं कर्म करोमितरां

ह्या सर्व प्रयोगांत तर व तं तरतमभाव दाखवितात. सारांश, मराठींत संस्कृतांतल्याप्रमाणें अतिशायन दाखविण्याचे सर्व प्रकार आहेत.

---

## ( ३० )

## कर्मप्रवचनीय

प्रत्ययांवरून विभक्ति ओळखाव्यात किंवा अर्थावरून विभक्ति ओळखाव्यात, असा एक वाद उपस्थित करून, दामल्यांनीं असा निर्णय दिला आहे कीं प्रत्ययां,

मराठी ग्रंथ संग्रहालय,

वरून विभक्ति ओळखणें जास्त सशास्त्र आहे. परंतु, दामल्यांचें हें मत सशास्त्र दिसत नाहीं. रामानें रावण मारिला, ह्या वाक्यांत रामानें ही तृतीया नेंप्रत्यया-वरून ओळखतां येते, हें दामल्यांना माहीत आहे. पण, गाय नदीनें चरत जाते, ह्या वाक्यांत केवळ नेंप्रत्ययावरून विभक्ति ओळखतां येतें असें दामले खचित म्हणणार नाहींत. कारण, नदीनें ह्या रूपांतील नेंप्रत्यय तृतीयेचा नाहीं, कर्मप्रवचनीय द्वितीयेचा आहे व तो संस्कृत अनु या कर्मप्रवचनीयापासून निघालेला आहे. म्हणजे मराठींत दोन नेंप्रत्यय आहेत. एक द्वितीयेचा व दुसरा तृतीयेचा. पैकीं एखाद्या वाक्यांत नें प्रत्यय कोणत्या विभक्तीचा आहे, हें ठरविण्यास, अर्थाखेरीज अन्य कोणता उपाय आहे बरें ? संस्कृतांत हि हा च प्रकार आहे. नदीभ्याम् हें रूप तृतीयेचें कीं चतुर्थीचें कीं पंचमीचें हें केवळ अर्थावरून ओळखावयाचें असतें. मराठींत क्रियापदांच्या हि विभक्तींना हा च दंडक लागू आहे. तो गेला; व तो गेला तर मी येईन; ह्या दोन वाक्यांत अर्थावरून विभक्ति ओळखणें भाग पडतें, प्रत्ययांवरून ती हटकून ओळखतां येईल च असा नेम नाहीं. सबब दामल्यांचें एतदर्थक विवेचन दुष्ट आहे, हें सांगावयाला नको च. हें विवेचन दुष्ट कां झालें ? तर दामल्यांना मराठी भाषेचा स्वभाव कळला नाहीं व पृथक्करण नीट करतां आलें नाहीं म्हणून. Ravana was killed by Rama आणि The cow is grazing by the river, अशीं दोन इंग्रजी वाक्यें आहेत. येथें Rama व river यांची case इंग्रज वैयाकरण Objective आहे म्हणून सांगतात; accusative व instrumental अशा दोन विभक्ति सांगत नाहींत. कारण काय ? तर Rama व river हे शब्द जसेचे तसे च आहेत, त्यांना विभक्तिविकरण होत नाहीं. इंग्रजींत objective हा शब्द केवळ संज्ञार्थक आहे, सार्थक नाहीं. Ravana was killed by Rama आणि The cow is grazing by the river, या वाक्यांत Rama and river are in the objective case, असें इंग्रज वैयाकरण म्हणतात. Are in the objective case म्हणजे Are governed by the preposition by, असें इंग्रज वैयाकरण सांगतात. Governed by the preposition by म्हणजे तरी काय ? By च्यामुळें Rama व river या शब्दांचें होतें तरी काय ? संस्कृतांतल्याप्रमाणें किंवा ल्याटिनांतल्याप्रमाणें रूप बदलतें ? नाहीं. मग governed या शब्दाचें सामर्थ्य काय ? कांहीं नाहीं. इंग्रज वैयाकरणांना एवढें च सांगावयाचें आहे कीं Rama आणि river हे शब्द क्रियापदांचे कर्ते नाहींत. जे शब्द कर्ते नाहींत त्या शब्दांना इंग्रज वैयाकरण objects म्हणतात. मग ते शब्द क्रियापदांचे objects असोत किंवा prepositions चे objects असोत. आतां object म्हणजे तरी काय ? ज्याच्यावर कांहीं क्रिया होते तें object, असें

इंग्रज वैयाकरण म्हणतात. Rama killed Ravana येथें रावणावर killing ची क्रिया झालेली आहे, सबब तो शब्द object आहे. पण, The cow is grazing by the river, येथें river वर काय क्रिया झालेली आहे? By ह्या preposition नें river या शब्दावर काय क्रिया केली? कांहीं क्रिया केली म्हणावें, तर by ह्या preposition ला क्रियासामर्थ्य आहे, असें म्हणावें लागतें. पण ज्या शब्दांना क्रियासामर्थ्य आहे, त्यांना इंग्रज वैयाकरण verbs म्हणतात. आतां by ला ते क्रियापद खाचित म्हणणार नाहींत. अर्थात्, by ला क्रियासामर्थ्य नाहीं. मग river हा शब्द by चा object आहे, या म्हणण्याचा अर्थ काय? अर्थ कांहीं नाहीं. इंग्रज वैयाकरणांना पृथक्करण करतां आलेलें नाहीं. By हा शब्द उपपद हि आहे व गति हि आहे. By the river येथें by हा शब्द उपपद आहे. He came by the money, येथें by हें गति आहे. By ह्या गतीनें come हें क्रियापद सकर्मक झालेलें आहे. Come by म्हणजे possess. Come by हा एक शब्द आहे. Money हा शब्द come by ह्या सकर्मक क्रियापदाचें object आहे. तसा कांहीं प्रकार by the river ह्या वाक्यखंडांत नाहीं. मग river हा शब्द by चा object आहे, ह्या म्हणण्याचा अर्थ काय? अर्थ एवढा च दिसतो कीं preposition च्या पुढें एखादें नाम आलें म्हणजे त्या नामाला object म्हणावें subject म्हणूं नये. Objective case म्हणजे द्वितीयेपासून सप्तमीपर्यंतच्या आपल्या मराठी किंवा संस्कृतभाषेंतील सर्व विभक्ति.

He came by the money ( द्वितीया )
He came with the man ( तृतीया )
He came to the town ( चतुर्थी )
He came from the town ( पंचमी )
He speaks of the man ( षष्ठी )
He lives in the town ( सप्तमी )

ह्या साही विभक्त्यांना इंग्रज वैयाकरण objective case म्हणतात व preposition च्या पुढील नामाला object म्हणतात. ज्याच्यावर कांहीं क्रिया घडली तें object व त्याची विभक्ति objective असें इंग्रज वैयाकरण ल्याटिन भाषेची परिभाषा उसनी घेऊन म्हणतात खरें. परंतु ल्याटिन भाषेंतील object चा जो अर्थ तो इंग्लिश वैयाकरणांचा object चा अर्थ नाहीं. तेव्हां इंग्रज वैयाकरणांचें object चें लक्षण कांहीं तरी आहे, हें उघड आहे. Objective case म्हणजे subjective case नाहीं व object म्हणजे subject नाहीं, एवढी गोष्ट इंग्रज वैयाकरणांना सांगावयाची आहे, परंतु ती त्यांना योग्य

नवीन शब्द निर्माण करून सांगतां आली नाहीं. तें काम इंग्रज वैयाकरणांच्या हितार्थ मी आतां करतो. Subject च्या case ला subject case म्हणावें. खऱ्या object च्या case ला object case म्हणावें आणि preposition च्या पुढें येणाऱ्या नामांच्या case ला preposition case म्हणावें. सकर्मक क्रियापदांच्या कर्माच्या case ला हे कोंगाडी इंग्रज वैयाकरण objective case म्हणतात व preposition च्या पुढें येणाऱ्या नामाच्या case ला हि हे शहाणे objective case च म्हणतात. Object ह्या शब्दाचें function दोन्हीं स्थलीं निरनिराळें आहे. अर्थात्, इंग्रज वैयाकरणांनीं आपली परिभाषा बदलली पाहिजे, व ह्या कोंगाड्यांचें अनुकरण मराठी वैयाकरणांनीं करण्यांत हांशील नाहीं. शिवाय हें हि ध्यानांत ठेविलें पाहिजे कीं विभक्ति या संज्ञेचा जो अर्थ संस्कृत किंवा मराठी वैयाकरण समजतात तो अर्थ case ह्या इंग्रजी संज्ञेचा नामासंबंधानें प्रायः नाहीं. संस्कृतांत विभक्ति हें विकरण आहे. इंग्रजींत case हें प्रायः विकरण नाहीं. नाम कर्ता असो, कर्म असो किंवा preposition च्या पुढें असो, त्याला case नें विकरण होत नाहीं. म्हणजे इंग्रजींत विभक्तिविकरण नामांना नाहीं. सर्वनामांना आहे व possessive case मध्यें आहे. ही possessive इंग्रजींत अलीकडे फार कमी योजिली जाते. तेव्हां तिला सोडून देऊन, व सर्वनाम सोडून देऊन, निव्वळ नामांकडे पाहिलें असतां, इंग्रजींत case नें नामांना विकरण होत नाहीं. Work हें नाम घ्या. कर्ता असो, कर्म असो किंवा preposition पुढें येवो, work या नामाला त्या त्या case नें विकरण होत नाहीं. तेव्हां इंग्रजी भाषेंत नाम कर्ता आहे, कीं कर्म आहे, कीं काय आहे तें केवळ अर्थावरून व क्वचित् स्थलावरून ओळखावयाचें असतें. कधीं कधीं तें हि ओळखण्याची मारामार च पडते. कवितेंत तर पडते च पडते. [समजा कोणी कवी काव्य करतो आहे किंवा कोणी वक्ता आवेशानें बोलतो आहे, आणि त्या भरांत खालील वाक्य प्रसवतो आहेः—

Shakespeare Milton Knew.

येथें Shakespeare knew Milton किंवा Milton knew Shakespeare हें केवळ संदर्भावरून जाणावयाचें आहे. ज्याला Shakespeare हि माहीत नाहीं व Milton हि माहीत नाहीं व जो केवळ व्याकरणाच्या नियमानें वाक्याचा अर्थ करूं जाईल त्याला फक्त Shakespeare knew Milton हा एक च अर्थ प्रतीत होईल. तो अर्थ चुकीचा होईल, हें सांगावयाला नको च. तात्पर्य, नामांना इंग्रजींत विभक्तिविकरण नाहीं. Nominative असो, objective असो कीं Vocative असो, इंग्रजींत नाम जसेचें तसें च रहातें. असें सर्व विभक्तींत एका च रूपानें रहाणारें नाम मराठींत दामल्यांना भेटतें तर ते

१०

असें म्हणतें कीं त्या शब्दाला एक च विभक्ति आहे व ती प्रथमा आहे. प्रथमेचा अर्थ कधीं कर्ता, कधीं कर्म, कधीं संबोधन व कधीं कांहीं तरी असतो, असें दामले म्हणते. असें एकटें दामले च म्हणतात असें नाहीं, तर इतर कोणी हि दोन डोळ्यांचा माणूस सरुद्दर्शनीं असें च म्हणेल. मग इंग्रज वैयाकरण Nominative case निराळी, objective case निराळी, Vocative case निराळी, असें कां म्हणतात. तर case या शब्दाचा अर्थ इंग्रजी नामांचा विचार करतांना विभक्ति असा नाहीं. Case या शब्दाचा अर्थ स्थिति, Condition असा इंग्रज वैयाकरण करतात. म्हणजे क्रियापदाच्या पूर्वी येणारें जें नाम त्याची Nominative case व सकर्मक क्रियापद असल्यास त्याच्या पुढें येणाऱ्या किंवा preposition च्या पुढें येणाऱ्या नामाची case, objective म्हणतात. असा जरी सामान्य नियम आहे; तत्रापि कधीं कधीं

Shakespeare Milton Knew

अशा सारख्या वाक्यांत object क्रियापदाच्या पूर्वी येऊं शकतें. तेव्हां case या शब्दाचा अर्थ स्थिति असा हि नाहीं. मग case या शब्दाचा अर्थ काय ? व object या शब्दाचा अर्थ काय ? तर धातूचें रूप ज्याच्या अनुरोधानें चालतें तो शब्द subject व ज्याच्या अनुरोधानें चालत नाहीं तो शब्द object म्हणावा आणि subject ची case, nominative म्हणावी व object ची case, objective म्हणावी, असें म्हणणें प्राप्त होतें. म्हणजे स्थितिवरून हि कोणी शब्द object आहे कीं subject आहे, हें इंग्रजींत निश्चयानें सांगतां येत नाहीं. फक्त बोलणाऱ्याच्या हेतूवरून subject कीं object आणि nominative कीं objective, case ओळखावयाची आहे. कारण उघड आहे. इंग्रजींत विभक्तिविकरण नाहीं व विकरणावरून विभक्ति ओळखण्याची सोय नाहीं. ह्याचा अर्थ स्पष्ट असा कीं इंग्रजींत नामांना विभक्ति नाहीं. त्यांतून मधून nominative, objective वगैरे शब्द निष्कारण घेऊन इंग्रज वैयाकरणांनीं घोटाळा माजविलेला आहे. तेव्हां, ह्या इंग्रजी घोटाळ्याचा आश्रय करून आपल्या मराठी भाषेचें चालणार नाहीं. तेव्हां,

गाय नदीनें चरते

या वाक्यांत नदीनें या रूपांतील नदी शब्दाची विभक्ति कोंगाड्या इंग्रजीकडे न पहातां आपण स्वतंत्रपणें संस्कृताकडे पाहून ठरविली पाहिजे. येथें नदीनें ही कांहीं तृतीया नाहीं. कां नाहीं ? तर खालील उदाहरणें पहा.

गाय नद्यानद्यानें चरते (अनेकवचन).

तो घरांघरांनें भिक्षा मागतो (अनेकवचन).

किंवा

गाय नद्यानद्यान चरते

तो घरांघरांन भिक्षा मागतो.

गाय रस्त्यानें किंवा रस्त्यान पळत सुटली ( एकवचन )

गाय रस्त्यां रस्त्यांन किंवा रस्त्यांरस्त्यांनें पळत सुटली ( अनेकवचन )

ह्या वाक्यांत तृतीयेच्या अनेकवचनी नीं प्रत्ययाप्रमाणें नें किंवा न प्रत्यय बदलून नीं होत नाहीं; नें किंवा न च रहातो. उघड च आहे. हा कर्मप्रवचनीय नें किंवा न प्रत्यय संस्कृत कर्मप्रवचनीय जें अनु त्याजपासून निघाला आहे. ह्या संस्कृत अनु ला अनेकवचनीं किंवा एकवचनीं विकरण नाहीं. अनु अव्यय आहे. तृतीयेचे एकवचनी इन व अनेकवचनी भिस् किंवा ऐस् असे भिन्न प्रत्यय असल्या-मुळें मराठींत एकवचनी नें व अनेकवचनी नीं हे भिन्न प्रत्यय तृतीयेचे मराठींत वंशपरेनें उतरले आहेत. त्याप्रमाणें च अनु या अव्ययसंज्ञक कर्मप्रवचनीया-पासून वंशपरेनें मराठींत नें व न हें अव्ययसंज्ञक कर्मप्रवचनीय आलें आहे. जो जो म्हणून प्रत्यय संस्कृत कर्मप्रवचनीयापासून मराठींत आला आहे त्या त्या प्रत्ययाची स्थिति मराठींत अशी च अव्यय आहे.

परा = ला { तो मुली ला मारतो = स पुत्रीं परा मारयति ( एकवचन )
तो मुलींन् ला किंवा मुलीं ला मारतो = स पुत्रीः परा मारयति (अ. व.) }

प्रति = तें { तो रामा तें मारतो = स राम प्रति मारयति ( एकवचन )
तो रामां तें मारतो = स रामान् प्रति मारयति ( अनेकवचन ) }

सं = स { तो रामा स मारतो = स रामं सं मारयति ( एकवचन )
तो रामां स मारतो = स रामान् सं मारयति ( अनेकवचन ) }

उप = प { घरा प = गृहं उप
घरां प = गृहान् उप }

उपरि = वर { घरा वर = गृहं उपरि
घरां वर = गृहान् उपरि }

तात्पर्य, नें व न हें कर्मप्रवचनीय आहे व त्याच्या आधीं शब्दाची द्वितीया होते. नदी नें किंवा नदी न येथें नदी द्वितीया, नें किंवा न या कर्मप्रवचनीयामुळें.

---

## ( ३१ )

## सामान्यरूप

नदी

१ नदी नद्या

| | | |
|---|---|---|
| २ | नदी | नद्या |
| | नदी स | नद्या स |
| | नदी ला | नद्या ला |
| | नदी तें | नद्या तें |
| | नदी नें, न | नद्या नें न |
| ३ | नदीनें | नद्या नीं |
| ४ | नदीस | नद्यास |
| ५ | नदीहून | नद्याहून |
| ६ | नदी | नद्या |
| ७ | नदींत | नद्यांत |

राम

| | | |
|---|---|---|
| १ | राम | राम |
| २ | राम | राम |
| | रामा | रामां |
| | रामा स | रामां स |

इ. इ. इ.

म्हणजे, स, ला, तें, न, नें, हून व त हे प्रत्यय व कर्मप्रवचनीयें निराळीं काढलीं म्हणजे मराठींत शब्दाच्या दोन च विभक्ति रहातात. एक प्रथमा व दुसरी द्वितीया. राम ( कर्ता व कर्म ) ही प्रथमा; आणि रामा ही द्वितीया. प्रथमा म्हणजे पहिली विभक्ति व द्वितीया म्हणजे दुसरी विभक्ति. नदी ( एकवचन ), नद्या ( अनेकवचन ) या शब्दाला एक प्रथमा ऊर्फ पहिली च तेवढी विभक्ति आहे. ह्या दुसऱ्या विभक्तीला मराठी वैयाकरण सामान्यरूप म्हणतात. मराठीचें सशास्त्र व्याकरण रचायला जो जाईल त्याला मराठींत दोन च विभक्त्या ग्राह्य कराव्या लागतील. पहिली विभक्ति व दुसरी विभक्ति. पहिल्या विभक्तीचीं कारकें कर्ता व कर्म. दुसऱ्या विभक्तीचीं कारकें हवीं तितकीं. मराठी ही इंग्रजीप्रमाणें व्यस्त भाषा आहे, संस्कृताप्रमाणें समस्त भाषा नाहीं.

---

## ( ३१$\frac{1}{4}$ )

## प्रातिपदिक

प्रातिपदिकशब्दस्वरूपास वचन व विभक्ति यांचे प्रत्यय लागतात. संस्कृतांत सीता, रामा, रमा हे शब्द घेतले तर असें दिसतें कीं प्रातिपदिकशब्दस्वरूप व प्रथमेच्या एकवचनाचें रूप ह्या तीन स्त्रीलिंगी शब्दांचें एकसारखें आहे. नपुंसक-

लिंगी भगवत् शब्द घेतला, तर प्रातिपदिक व प्रथमेचें एकवचन एकसारखें आहे. म्हणजे संस्कृतांत मराठींतल्याप्रमाणें कांहीं शब्द असे आहेत कीं प्रातिपदिक-शब्दस्वरूप व प्रथमेच्या एकवचनाचें रूप जेथें एक च असतें. दामले म्हणतात (व्याकरण, पृष्ठ २६६ टीप), संस्कृत भाषेंत नामाचें मूळ रूप स्वतंत्र असून त्यास निरनिराळीं लिंगें, निरनिराळीं वचनें आणि निरनिराळ्या विभक्ती यांस अनुसरून निरनिराळे विकार होतात. म्हणजे दामल्यांना प्रातिपदिक ह्या संज्ञेचा अर्थ च कळलेला नाहीं. प्रातिपदिक या अर्थी **नामाचें मूळ रूप** हे शब्द दामले वापरतात. नामाच्या मूळ रूपाला म्हणजे प्रातिपदिकाला लिंग-विकार होतो, ही बाब संस्कृत व्याकरणांत दामल्यांनीं नवीन च शोधून काढिली आहे व ती पाणिनीला दामल्यांपासून शिकली पाहिजे. खरा प्रकार असा आहे कीं प्रातिपदिकांना संस्कृतांत लिंग-विकार होणें शक्य नाहीं. कारण प्रातिपदिकाचें लिंग अगोधर ठरलेलें व साधलेलें च असतें. रमा हा स्त्रीलिंगी शब्द आहे व तो प्रातिपदिक आहे. ह्या प्रातिपदिकाला आणिक मूळ रूप दुसरें नाहीं व ह्याच्यापासून हि लिंग-विकार होऊन दुसरीं रूपें साधत नाहींत. त्या प्रातिपदिक-प्रकरणीं दामल्यांचें (२६६—२६७) सर्व लिहिणें कुचकामाचें आहे. मराठींत घोडा हें प्रातिपदिक आहे, घोडी हें प्रातिपदिक आहे व घोडें हें प्रातिपदिक आहे. दामले म्हणतात, घोडा, घोडी, घोडें या तीन शब्दांत घोड हें प्रातिपदिक आहे ! परंतु तसा हास्योत्पादक प्रकार नाहीं. घोडा, घोडी, घोडें हीं मराठी प्रातिपदिकें घोटक, घोटिका, घोटक, या संस्कृत प्रातिपदिकांसारखीं च हुबेहुब आहेत. मराठींत ह्या तिन्हीं स्थलीं प्रातिपदिकशब्दस्वरूप व प्रथमेचें एकवचनी रूप सारखें असतें. संस्कृतांत घोटिका या एका स्थलीं मात्र प्रातिपदिकरूप व प्रथमा-एकवचनरूप सारखें असतें, पुल्लिंगी व नपुंसकलिंगी नसतें. अर्थवद् अधातुः अप्रत्ययः प्रातिपदिकं (धातुं, प्रत्ययं, प्रत्ययान्तं च वर्जयित्वा अर्थवच्छब्दस्वरूपं प्रातिपदिकसंज्ञं स्यात्). धातु, प्रत्यय, व प्रत्ययान्तरूप यांखेरीज जें अर्थवत् शब्दस्वरूप तें प्रातिपदिकसंज्ञक होय. म्हणजे रमा शब्द घेतला, तर रम् धातु, रमया प्रत्ययान्त रूप व आ प्रत्यय, ह्यांना वगळून जें अर्थवत् रमाशब्दस्वरूप रहातें तें प्रातिपदिक होय. तसें च घोडा शब्द घेतला तर घोड् धातु, घोड्यास प्रत्ययान्त रूप व आस प्रत्यय, ह्यांना वगळून जें अर्थवत् घोडाशब्दस्वरूप तें प्रातिपदिकसंज्ञक होय. ह्यांत एवढें च निष्पन्न होतें कीं प्रातिपदिक या संज्ञेचा अर्थ दामल्यांस नीट माहीत नाहीं.

---

## (३१½)

दामल्यांची तिङन्तप्रक्रिया येथूनतेथून प्रमादग्रस्त आहे म्हणून मागें सांगितलें. दामल्यांची सुबन्तप्रक्रिया तर तिङन्तप्रक्रियेहून हि दोषग्रस्त आहे, हें येथपर्यंतच्या

| | | | |
|---|---|---|---|
| गंगू | गंगू | किंवा | गंगवू, गंगूय, गंगूवे |
| हो | हो | किंवा | हाव्, होवू, होयू |
| हरि | हरी | किंवा | हरयू, हरीयू |
| रामू | रामू | किंवा | रामवू, रामूयू |
| बरवे | बरवे | किंवा | बरवेयू |
| रानडे | रानडे | किंवा | रानडेयू |
| काळे | काळे | किंवा | काळेयू |
| सीता | सीते | किंवा | सीतेयू |
| मामंजी | मामंजी | किंवा | मामंजीयू |
| बाई | बाई | किंवा | बाईयू |
| अण्णा | अण्णा | किंवा | अण्णावू |
| राम | राम | किंवा | रामा |
| भार्गव | भार्गव | किंवा | भार्गवा |
| गोविंद् | गोविंद् | किंवा | गोविंदा |
| हळवे | हळवे | किंवा | हळवेयू |

वशिष्ठधर्मशास्त्रांत व आपस्तंबधर्मशास्त्रांत संबोधनाचा अंत्य अप्लुत उच्चारावा, व संबोधनाचा अंत्य ए किंवा ओ यांचा उच्चार आयू, आव् किंवा आय, आव करावा असें सांगितलें आहे. पाणिनीयांत व मनुस्मृतींत प्लुत उच्चार, शूद्रांच्या नांवाखेरीज, करावा असें सांगितलें आहे. ती च पद्धती कांहीं फरकानें मराठींत उतरली आहे.

---

( ३१$\frac{3}{4}$ )

सुप् व तिङ् एतत्संबंधिक किंचित् टिप्पण येथपर्यंत केलें. आतां मातृकांकडे वळूं.

( १ )

कोणत्या हि स्वरास व स्वरयुक्त व्यंजनास अक्षर म्हणतात ( दामले व्याकरण, पृष्ठ ३० ). ही व्याख्या दुष्ट आहे. स्वरास किंवा स्वरयुक्त व्यंजनास अक्षर म्हणत नाहींत. स्वराच्या किंवा व्यंजनाच्या लेखी खुणेस अक्षर म्हणतात. शास्त्रीय भाषेंत धरसोड उपयोगाची नाहीं, हें उत्तम तत्व दामल्यांना मान्य आहे ( व्याकरण पृष्ट ३० ). सबब " लेखी खुणेस " हे शब्द दामल्यांनीं आपल्या अक्षराच्या लक्षणांत घालावे. स्वर व व्यंजनें मिळून मूल उच्चार होतात. उच्चार हे फक्त मुखानें उच्चारिले जातात. ते जेव्हां खुणांनीं कागदावर दर्शविले जातात, तेव्हां

त्या खुणांना अक्षरें म्हणतात. एखाद्या मुलाचें गु हें अक्षर चांगलें आहे असें जेव्हां पंतोजी म्हणतो, तेव्हां मुलगा गु हा उच्चार चांगला उच्चारतो, असें म्हणण्याचा पंतोजीचा अभिप्राय नसतो; तर गु उच्चाराची जी मोडी किंवा बाळबोध खूण ती मुलगा वळणदार काढतो असें म्हणण्याचा त्याचा अभिप्राय असतो.

( २ )

मराठींत मूल उच्चार दामल्यांनीं एकंदर ४८ गणिले आहेत. त्यांना ते वर्ण म्हणतात, आणि त्यांचे तीन प्रकार करतातः—( १ ) स्वर, ( २ ) स्वरादि व (३) स्वरान्त किंवा व्यंजन. येथें स्वरान्त म्हणजे व्यंजन म्हणून दामले सांगतात. परंतु स्वस्युक्त व्यंजनास अक्षर म्हणतात. या लक्षणांत त्यांचा आशय असा दिसतो कीं व्यंजन दोन प्रकारचें असतें–( १ ) स्वरयुक्त व ( २ ) स्वररहित. म्हणजे व्यंजन स्वराहून निराळें आहे व तें सदा स्वरयुक्त असतें च असें नाहीं, असा अर्थ होतो. आणि असा जर अर्थ आहे, तर स्वरयुक्त व्यंजन जोडाक्षर ठरतें. तेव्हां स्वरायुक्तव्यंजनास जोडाक्षर म्हटलें पाहिजे, नुसतें अक्षर म्हणून शास्त्रीय व्यवहारांत भागावयाचें नाहीं. सबब, अक्षराचें लक्षण येणेंप्रमाणें करावेंः— कोणत्या हि स्वराच्या किंवा व्यंजनाच्या लेखी खुणेस अक्षर म्हणावें.

( ३ )

व्यंजनें स्वरयुक्त असतात किंवा स्वररहित असतात. अर्थात् केव्हां केव्हां त्यांचा उच्चार स्वराखेरीज होऊं शकतो. क्, ख्, ग् या व्यंजनांचा उच्चार स्वतंत्रपणें स्वराखेरीज होतो, ही अनुभवाची गोष्ट आहे. असें असून व्यंजनांची व्याख्या दामले अशी करितात कीं, ज्या वर्णाचा उच्चार दुसऱ्या वर्णाच्या म्हणजे स्वरांच्या साहाय्यावांचून होत नाहीं त्यांना व्यंजनें म्हणावें. पण जे वर्ण दुसऱ्या वर्णांचे साहाय्य घेतील ते जोडाक्षर या संज्ञेस पात्र होतील व त्यांस मूल साधे एकेरी वर्ण म्हणतां येणार नाहीं. दामल्यांचीं गुलाम व्यंजनें तर साधीं एकेरी आहेत, असा त्यांचा आशय आहे. तेव्हां, निष्पत्ति अशी होते कीं स्वरांचें साहाय्य घेऊन जोडाक्षरें बनलेलीं व्यंजनें एकेरी आहेत. हें विरोधी असल्यामुळें नितांत त्याज्य होय. दोन या संख्येला एक म्हणावयाला शिकविण्यापैकीं च हें न्यायशास्त्र दिसतें. तात्पर्य काय कीं दामल्यांच्या ह्या स्वरांच्या व व्यंजनांच्या व्याख्या अत्यन्त गचाळ आहेत. त्या इंग्रज वैयाकरणांच्या गचाळ लक्षणांवरून घेतलेल्या आहेत. वस्तुस्थिति अशी आहे कीं स्वरांचा हि उच्चार स्वतंत्रपणें करतां येतो व व्यंजनांचा हि उच्चार स्वरांचें किंवा दुसऱ्या कोणाचें साहाय्य घेतल्याशिवाय करतां येतो. पाणिनीनें स्वर व व्यंजन असा भेद केलेला नाहीं; अच् व हल् असे व्याकरणाच्या सोईसाठीं प्रत्याहार केलेले आहेत. अचांचा स्वतंत्र उच्चार होतो व हलांचा स्वतंत्र उच्चार होत नाहीं

म्हणून पाणिनीनें अच् व हल् असा भेद केलेला नाहीं. हलांतील अ इत् आहे म्हणून तो ज्ञापकानें सांगतो. हा इत् येवढ्या च करितां हलांत ठेविला आहे कीं त्याच्या साहाय्यानें सूत्रांत वारंवार अति जोडाक्षरें येऊं नयेत. उदाहरणार्थ, इको यण् अचि । हें सूत्र घ्या. समजा कीं य ह्या अक्षरांतील इत् जो अ तो काढून टाकला, तर हें सूत्र असें उच्चारावयाला लागेलः-- इको य्णचि । प्रत्याहार यण् असा न होतां, य्ण् असा जोड होईल. हल् हा प्रत्याहार ह्ल् असा होईल. असे जरि जोड प्रत्याहार झाले, तत्रापि पाणिनीय शास्त्राचें कांहीं च बिघडलें नसतें. इतकेंच कीं उच्चार करण्याला किंचित् काठिन्य आलें असतें. म्हणजे जोड व्यंजनांचा स्वतंत्र उच्चार होत नाहीं असें नव्हे; तर स्वतंत्र उच्चार करण्यास किंचित् कठिण जातें. तेव्हां व्यंजनाची जरूर च असल्यास व्याख्या अशी करावीः--ज्या वर्णांचा उच्चार जोड असतां स्वरांच्या साहाय्यावांचून करणें किंचित् कठिण जातें त्यांना व्यंजनें म्हणावें. व्यंजनाचा स्पष्ट उच्चार होण्याला पुढें किंवा मागें स्वर सदा लागतो च असा नियम नाहीं. उदाहरणार्थ, स्थ्य, स्फ्य, स्म्थ, स्म्य, हीं जोडाक्षरें घ्या ह्यांत ( १ ) थ्, ( २ ) फ्, ऱ्, ( ३ ) म्, ( ४ ) म्, ऱ्, हीं एकेक दोनदोन व्यंजनें, पुढें व मागें व्यंजनें असून आणि पुढें व मागें स्वर नसून, स्पष्ट उच्चारतां येतात. तेव्हां उच्चारार्थ, व्यंजनांना स्वरांची जरूर च असते, असा नियम नाहीं. परंतु उच्चारधर्माच्या आधारावर ही व्यंजनांची व्याख्या करून व्याकरणशास्त्रांत काय कार्य होतें? कशाकरितां ही व्याख्या करावयाची? वस्तूंचीं लक्षणें जीं करावयाचीं तीं त्या त्या शास्त्राला उपकारक अशीं असावीं लागतात. अच्कार्यें निराळीं व हल्कार्यें निराळीं, म्हणून पाणिनीनें अच् व हल् व इतर पंचवीस भिन्न प्रत्याहार वर्णिले आहेत. तशीं मराठी व्याकरणांत उच्चारसाहाय्यधर्मावरून स्वरांचीं कोणतीं निराळीं कार्यें व्यंजनांच्या कोणत्या कार्यांपासून दामल्यांनीं भिन्न असलेलीं पाहिलीं आहेत? प्रायः ह्या नसलेल्या धर्मावरून कोणतीं च कार्यें मराठींत झालेलीं आढळत नाहींत. कारण उघड आहे. हा धर्म च मुळीं व्यावर्तक व विद्यमान नाहीं. उच्चाराचा प्रश्न कमी अधिक काठिन्याचा म्हणजे इयत्तेचा आहे, ईदृक्तेचा नाहीं. सबब हीं लक्षणें मराठी व्याकरणांत अनुपकारक आहेत.

( ४ )

स्वरादि वर्ण

ही काय बाब आहे? अनुस्वार, अनुनासिक व विसर्ग हे स्वर आहेत कीं व्यंजनें आहेत? हे स्वर हि नाहींत व व्यंजनें हि नाहींत, असें दामले म्हणतात.

( अ )

अनुस्वार

संस्कृतांत अनुस्वार ज्या ऱ्हस्व स्वराच्या मागून येतो ( अनु + स्वर ) त्या ऱ्हस्व स्वराला पुढें व्यंजन असतां तो दीर्घत्व देतो. अनुस्वाराचा हा धर्म व्यंजनाच्या धर्मासारखा च आहे. ऱ्हस्व स्वराच्या पुढें जर दोन व्यंजनें ऊर्फ जोड व्यंजनें ऊर्फ संयुक्त व्यंजनें आलीं तर तो ऱ्हस्व स्वर उच्चाराच्या बाबतींत दीर्घ मानिला जातो. तसें च अनुस्वाराच्या पुढें जर अ आ वगैरे स्वर आले तर त्या अनुस्वाराचें खाडकन् म् हें व्यंजन होऊन त्याची द्वादशाक्षरी ऊर्फ बाराखडी होते. मोनुस्वारः । असें पाणिनीय सूत्र च आहे. मः स्थानें अनुस्वारः भवति । म् च्या जागीं अनुस्वार येतो. ह्याचा अर्थ इतका च कीं अनुस्वार हा व्यंजन आहे. मः स्थाने जो अनुस्वार येतो तो कोणत्या हि स्थानचा अनुनासिक नसतो. स्पर्शांमागें अनुस्वार आला असतां त्याचा उच्चार त्या त्या स्थानच्या अनुनासिकासारखा विकल्पानें होतो. म्हणजे अनुस्वार हा व्यंजन आहे.

( आ )

अनुनासिक ह्या पारिभाषिक शब्दाचे पाणिनीय शास्त्रांत दोन अर्थ आहेत. ङ्, ञ्, ण् न्, म् यांना पाणिनि अनुनासिक व्यंजनें म्हणतो. व अप्रगृह्य स्वर विकल्पानें अनुनासिक असतात म्हणून जेथें सांगतो ( मराठींतील अनुनासिकाची परंपरा हा निबंध पहा–ग्रंथमाला. ) तेथें स्वराना हि अनुनासिक स्वर म्हणतो. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे अनुनासिक हा नाकांतला ओझरता उच्चार, स्वरांची केवळ एक वृत्ति आहे. जशी प्लुतत्व ही वृत्ति आहे तशी च सानुनासिकत्व ही स्वरांची वृत्ति आहे.

( इ )

विसर्ग हा अनुस्वाराप्रमाणें च वर्तनांत आहे.

अनुस्वार, अनुनासिक व विसर्ग ह्यांचें स्वरूप हें असें आहे. पैकीं अनुस्वार व विसर्ग यांचे उच्चार स्वराखेरीज होतात. अनुनासिकत्व ही स्वराची वृत्ति असल्यामुळें ती मात्र स्वराश्रित असते. अनुनासिक हा स्वतंत्र उच्चार नाहीं. तेव्हां दामल्यांना असा प्रश्न आहे कीं स्वरादि हें काय प्रकरण आहे? व हें कोणता विशेष शास्त्रीय धर्म पाहून बनविलेलें आहे?

( ४२ )

आतां शास्त्राची करडी दृष्टि हल्संज्ञक वर्णांना लावूं. ख, घ, छ, झ, ठ, ढ, थ, ध, फ, भ हे महाप्राण क् + ह्, ग् + ह्, अशा तऱ्हेनें वस्तुतः जोडाक्षरें आहेत, असें

दामल्यांचें मत आहे. मग, तीं तशीं जोडाक्षरें आहेत, हें स्पष्ट सांगून त्यांना मूळ वर्णांतून काढून टाकण्यास काय हरकत आहे ? अवश्य काढून टाकावीं. इंग्रजींतील एक असें च प्रत्यन्तर देतों. V हा वर्ण आहे. ह्याचा उच्चार व्ह. ह्या V ( व्ह ) ला इंग्रज वैयाकरण मूलवर्णांत रूढिस्तव गणतात. परंतु शास्त्रतः V ही खूण व्ह या जोडाक्षराची आहे; आपल्या मराठींतील क्ष, ज्ञ या जोडाक्षरी खूणांसारखी. आतां पाणिनीनें ख ला मूलोच्चारांतून काढून कां टाकलें नाहीं ? तर क् व ह् यांचा संधि ख् होत नाहीं म्हणून. क् + ह् = ग्घ्. ग् + ह् = ग्घ्. तेव्हां ख् व घ् हीं जोडाक्षरें नाहींत. ती च कथा इतर महाप्राणांची आहे. ख् हा उच्चार क् व ह् यांचा संधि नाहीं. कृत अल्पप्राण आहे व खूत महाप्राण आहे, इतकें च. महाप्राण म्हणजे ह नव्हे. इंग्रजींत ख् kh असा काढतात व k त h मिळवितात. परंतु ती त्या लोकांची चूक आहे. H म्हणजे जर ह् असेल तर kh म्हणजे क् + ह् = ग्घ होईल, ख होणार नाहीं.

( ५ )

महाप्राण ह्याची तरी इयत्ता काय ? तर प्रत्येक स्थानाचे खालून वर जितकीं अक्षरें त्या स्थानांत असतील तितके भाग केलेले आहेत. पैकीं दुसऱ्या व चौथ्या भागाला संस्कृत वैयाकरण महाप्राण ही संज्ञा देतात. कंठस्थानाचे एकंदर भाग नऊ आहेत, तालव्याचे ९, मूर्धन्याचें ८, दंत्याचे ८, ओष्ठस्थानाचे ७, कंठतालव्याचे ३, कंठौष्ठाचे २, दंतौष्ठाचे २, पश्चात् तालव्याचे ७, अनुनासिक व्यंजनें ५ व अनुनासिक स्वर १ हे इतके उच्चार मराठींत आहेत. य व श हे मराठींत दंत्यतालव्य आहेत. य हा कंठतालव्य हि आहे. वरचे दांत व खालचा ओठ मिळून दंतौष्ठ्य, फ, व असे २ वर्ण आहेत. बर्फ ह्या शब्दांतील फ इंग्रजींतल्या f सारखा विकल्पानें उच्चारलेला आढळतो. अशिष्टांत भग ह्या शब्दाचा भोक या शब्दाच्या उच्चाराच्या जवळजवळ ओष्ठकंठ्य उच्चार होतो. इंग्रजींतील Boy ह्या शब्दांतील o च्या उच्चारासारखा भग या शब्दांतील अ चा उच्चार होतो. ळ उच्चारतांना जीभ खालच्या दांताच्या मुळांशीं शेवटीं आपटते, सबब ळ मूर्धन्यदंत्य आहे. दामल्यांनीं विशेषेंकरून या शब्दानें बरेंच काम भागविलें आहे. परंतु तें शास्त्र नव्हे. उच्चाराच्या बाबींत कित्येक जर्मन ग्रंथकारांनीं फार सूक्ष्म विवेचन केलेलें आहे. तें सुज्ञांनीं पहावें. शास्त्रीय व्याकरणांत खडानखडा फोड झाली पाहिजे.

( ६ )

आवाज

निर्जीव आवाज | सजीव आवाज = वाचा

सजीव आवाज = वाचा → भाषा = मनुष्य वाचा | तिर्यग्वाणी

( ७ )

संस्कृत च्, छ्, ज्, झ्, ञ् हे तालव्य आहेत. तालूचा प्रांत मूर्धापासून कंठापर्यंत आहे. तालूच्या शेवटास च चें स्थान आहे व प्रारंभास ञ् चें स्थान आहे. य चें स्थान ञ् च्या पाठीमागें आहे. हा च प्रकार इतर हि स्थानांचा आहे. प्रथम अक्षर त्या त्या स्थानाच्या शेवटास सुरू होतें व शेवटचें अक्षर त्या स्थानाच्या प्रारंभीं उच्चारलें जातें. मराठी च्, छ्, ज्, झ्, ञ् ह्यांचें स्थान तालूचा द्वितीय अर्ध आहे. संस्कृत च वर्गाचें स्थान तालूचा प्रथमार्ध आहे. संस्कृत च वर्गाला पूर्वतालव्य व मराठी च वर्गाला पश्चात्तालव्य म्हणावें. मराठी च वर्गाचें स्थान मूर्ध जो टवर्ग त्याच्यापुढें आहे. संस्कृत च वर्गाचें स्थान मूर्ध ट वर्गाच्या मागें आहे. ! संस्कृत च वर्गाच्या व मराठी च च वर्गाच्या मध्यें ट वर्गाचें स्थान आहे.

इ. इ. इ

---

# ( ३२ )

## मराठी व्याकरणाच्या संशोधनाचे उगम

मराठी व्याकरणावर खालील लोकांनीं लिहिलेलें आहे. १ दादोबा पांडुरंग तर्खडकर २ कृष्णशास्त्री चिपळोणकर ३ कृष्णशास्त्री गोडबोले ४ Beames ५ Hoernle ६ Bhandarkar (Phonetics). ह्या पैकीं चिपळोणकर, गोडबोले, Hoernle व Bhandarkar हे संस्कृत व्याकरणाचे ज्ञाते होते व आहेत, दादोबा व Beams ह्यांना संस्कृत व्याकरण फारसें येत नव्हतें.

जुन्या मराठीवर खालील लोकांनीं लिहिलें आहे.

१ प्रस्तुत टीकाकार.

प्राकृत भाषांवर खालील लोकांनीं लिहिलें आहे. १ वररुचि २ कात्यायन ३ हेमचंद्र ४ Pischel

वैदिक व संस्कृत भाषांवर खालील लोकांनीं लिहिलें आहे. १ प्रातिशाख्यकार २ यास्क ३ पाणिनि ४ कात्यायन ५ पतंजलि ६ नागोजीभट्ट ७ सायण

मराठी भाषेचें ज्याला शास्त्रीय व्याकरण लिहावयाचें असेल त्यानें वर दिलेल्या ग्रंथकारांचा चांगला परिचय केला पाहिजे. वैदिक, संस्कृत, प्राकृत व मराठी भाषांवर आणीक शेंकडों हिंदू व यूरोपीयन लोकांनीं संशोधनात्मक, टीकात्मक, तर्कात्मक, तुलनात्मक, नाना तऱ्हेचे बरे वाईट लेख लिहिले आहेत. त्यांची गणना मी अनुषंगिकांत करीत असल्यामुळें, त्यांची नांवनिशी येथें देत नाहीं. आतां मीं जो हा प्रस्तुत लेख लिहिला तो लिहिण्यास मला कोणाचें साहाय्य झालें तें प्रांजलपणें सांगतों. गेलीं वीस वर्षें मराठी भाषेचे उगम मी शोधीत आहें. जसजसे जुने लेख सांपडत गेले तसतसे त्या लेखांतील भाषेचें पृथक्करण मी करीत असें. कांहीं वर्षें लोटल्यावर असें आढळून आलें कीं वर्तमान मराठींतील बरीं च रूपें जुन्या मराठींतून निघालेलीं आहेत. इतक्यांत मुकुंदराजी ज्ञानेश्वरीचा मला शोध लागला. त्या ज्ञानेश्वरींतील भाषेचा व इतर त्या कालीं सांपडलेल्या जुन्या लेखांचा अभ्यास करतां, असें आढळून आलें कीं वर्तमान मराठी भाषा ज्ञानेश्वरी मराठी भाषेपासून सर्वस्वी निघालेली आहे. त्यावरून असा एक कामचलाऊ सिद्धान्त बांधला कीं वर्तमान मराठी भाषा तत्पूर्वकालीन ज्ञानेश्वरी मराठी, अपभ्रंश, महाराष्ट्री, संस्कृत, व वैदिक ह्या भाषांपासून परंपरेनें निघालेली आहे. नंतर ह्या कामचलाऊ सिद्धान्ताची परीक्षा करूं लागलों. ही परीक्षा करितांना पिशेल ह्या जर्मन गृहस्थाच्या प्राकृत व्याकरणाचा मला बराच उपयोग झाला. ह्या गृहस्थानें त्याच्या वाचनांत आलेलीं एकोन एक प्राकृत रूपें सशास्त्र पद्धतीनें एका ठिकाणीं संकलित केलीं आहेत. ह्या ग्रंथांत दोन ठिकाणीं मला दोष दिसून आला. (१) Passive व Causal passive ह्यांचें पृथक्करण व रूपसंकलन या गृहस्थाच्या हातून नीट झालेलें नाहीं असें आढळून आलें. व (२) सर्वनामांचा विचार ह्या गृहस्थानें कोता केला आहे, असें दिसून आलें. बाकीं, ज्ञानेश्वरींतील मराठी भाषेचें व्याकरण लिहितांना, पिशेलच्या ग्रंथाचा मला चांगला उपयोग झाला. ज्ञानेश्वरींतील मराठी भाषेचें व्याकरण लिहितांना जर पिशेलचा ग्रंथ उपलब्ध नसता, तर वररुचि, कात्यायन, हेमचंद्र वगैरे प्राकृत वैयाकरणांच्या ग्रंथांचें व इतर उपलब्ध प्राकृत ग्रंथांचें व शिलालेखांचें पृथक्करण व संकलन करून पिशेलचें च काम मला करावें लागतें. असा प्रयत्न करण्याचा प्रारंभ हि मी केला होता. इतक्यांत पिशेलचा ग्रंथ प्रसिद्ध झाला. ह्या ग्रंथावरून जुन्या मराठीची आणि अपभ्रंश व महाराष्ट्री यांची सांगड उत्तमोत्तम लागते, असें दिसून आलें. तत्रापि, ज्ञानेश्वरी मराठी भाषेचें व्याकरण लिहिल्यावर, मला असें आढळून येऊं लागलें कीं केवळ पिशेलनें दिलेल्या अपभ्रंशांतील व महाराष्ट्र्यादि प्राकृत भाषांतील रूपांवरून

REFBK-0014093

REFBK-0014093